


# दैनिक जनता आवाज




अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १२७ मंगळवार, दि. ०१ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

# ...आम्ही दबावाला झुकणार नाही!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; हिंदी सक्तीच्या मुद्यावरून विरोधकांना टोला

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतल्यानंतर विरोधकांनी महायुती सरकारची चौफेर कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले सरकार कुणाच्याही दबावापुढे झुकणार नसल्याचे ठणकावून सांगितले आहे. सरकारने हिंदीच्या मुद्यावर एक समिती स्थापन केली आहे. ही समितीच आता योग्य तो निर्णय घेईल. सरकार केवळ कोणत्याही पक्षाचे हित पाहणार नाही, केवळ महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांचे लक्ष पाहील. आम्ही कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही, असे ते म्हणालेत. ठाकरे बंधूंनी एकत्र येऊन क्रिकेट खेळावे, स्वीमिंग करावी आम्हाला काही अडचण नाही, असा टोलाही त्यांनी यावेळी ठाकरे बंधूंना हाणला.**

भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी भाजप प्रदेशाध्यक्ष पदासाठी अर्ज भरला. त्यांची या पदासाठी निवड जवळपास निश्चित आहे. त्याची औपचारिक घोषणा आज होण्याची शक्यता आहे. यावेळी पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदीच्या कथित सक्तीच्या मुद्यावर सरकार कुणापुढेही न झुकता विद्यार्थी हिताचा निर्णय घेईल असे स्पष्ट केले.

फडणवीस म्हणाले, मी काय दोन भावांनी एकत्रित न येण्याचा जीआर काढला आहे काय? मी असा कोणताही जीआर काढला नाही. उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात जो अहवाल आला होता, त्या अहवालात त्यांचा उजवा हात मानला जाणाऱ्या उपनेत्याने पहिली ते बारावी हिंदी सक्तीची करा असे लिहिले होते. हा अहवाल उद्धव ठाकरे यांनी मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकारला. त्यानंतर नेहमीच्या सवयीप्रमाणे घुमजाव केले. त्यानंतरही आम्ही कोणताही इगो न मानता त्यासंदर्भातील निर्णय केला आहे. मी पुन्हा एकदा सांगतो. आम्ही निर्णय केला, आता समिती स्थापन केली आहे. ही समितीच आता योग्य ते ठरवेल. आम्ही कोणत्याही पक्षाचे हित पाहणार नाही. आम्ही महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांचे पाहू. महाराष्ट्राचे सरकार विद्यार्थ्यांच्या हिताचाच निर्णय घेईल. आम्ही कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही.



मुख्यमंत्र्यांनी यावेळी उद्धव ठाकरे यांनी जनसुरक्षा विधेयकाला केलेल्या विरोधाचाही चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले, हे दुटप्पी लोक आहेत. यांचे सत्तेतील रुप वेगळे असते व विरोधातील रुप वेगळे असते. खासगीत विचारले तर आणखी वेगळे रुप असते. त्यामुळे ते काय म्हणतात याच्याशी आम्हाला काही देणेघेणे नाही. आम्ही महाराष्ट्राला, महाराष्ट्राच्या जनतेला, भारताच्या संविधानाला उत्तरदायी आहोत.

भारताच्या संविधानाचा कुणी अवमान करत असेल तर त्याच्यावर कारवाई करण्यासाठी कायदा तयार होईलच. हा कायदा केवळ त्यांच्याविरोधात आहे, जे भारताचे संविधान मानत नाहीत. जे भारतात अराजक माजवत आहेत. त्या अराजकवादी शक्तींच्या विरोधात कायदा आहे. त्यांचा अराजकतेला पाठिंबा असेल, तर त्यांनी तसे स्पष्ट करावे. अराजकतेला पाठिंबा द्यायचा आणि लोकशाहीचे समर्थन करायचे. संविधान पायदळी तुडवणाऱ्यांच्या सोबत उभे राहायचे हे कुठेतरी बंद केले पाहिजे, असे फडणवीस म्हणाले. दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांच्या नाराजीवरही सूचक भाष्य केले. अलीकडच्या काळात ते कविता, शेरोशायरी माध्यमातून आपली नाराजी व्यक्त करत आहेत. त्यांचे नवीन स्टेटस येईल त्यावरून तुम्ही अंदाज बांधा, असे ते म्हणाले.

### ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याला हाणला टोला

ठाकरे बंधू एकत्र येत असतील तर मला त्याचा अतिशय आनंद आहे. त्यांनी जरूर एकत्र यावे. फक्त राज ठाकरे यांनी पहिली ते बारावीपर्यंत हिंदी सक्तीची सक्ती करण्याचा निर्णय तुमच्या काळात का घेण्यात आला. हा प्रश्न मला विचारण्यापेक्षा उद्धव ठाकरे यांना विचारला पाहिजे. बाकी त्यांनी एकत्र येऊन क्रिकेट खेळावे, हॉकी खेळावी, टेनिस खेळावे, स्वीमिंग करावी, जेवण करावे आम्हाला काही अडचण नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हटले.

## संमिश्र

### राज्यात गरीब, दुर्लक्षित समाजावर अन्याय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले आहे. परिणामी, राज्यात गरीब व दुर्लक्षित घटकांवरील अन्याय वाढला आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सोमवारी केला. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरूवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या.

### भाजपला मिळणार नवा प्रदेशाध्यक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : भारतीय जनता पक्षाला लवकरच नवीन प्रदेशाध्यक्ष मिळणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जागी आता प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती होणार आहे. यासाठी रविंद्र चव्हाण यांनी आपला अर्ज केंद्रीय निरीक्षक किरेन रिजुजी यांच्याकडे दाखल केला आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह राज्यातील भाजपचे प्रमुख नेते उपस्थित होते. १ जुलै रोजी संध्याकाळी भाजपच्या नव्या प्रदेशाध्यक्षांच्या नावाची घोषणा होणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे हे राज्य मंत्रिमंडळात मंत्री झाल्यानंतर रवींद्र चव्हाण यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती.

### पुण्यात मद्यपी ठेकेदाराकडे रिव्हॉल्व्हर आढळले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : पोलिसांनी केलेल्या नाकाबंदीत मद्यपी मोटारचालकाने तपासणी करण्यास नकार देऊन पोलिसांशी अरेरावी केली. कारवाईस विरोध करुन तपासणी करणाऱ्या पोलिसांसमोर गळफास घेऊन आत्महत्या करण्याची धमकी दिली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडे रिव्हॉल्व्हर सापडले. लष्कर भागात ही घटना घडली. याप्रकरणी मोटार चालकासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. अरुण निवृत्ती सूर्यवंशी (वय ५०, रा. सेक्टर नं. ८, एरोली, नवी मुंबई), बाबुराव धर्माजी आंबेगावे (वय ५५, रा. सोमराणा ता. उदगीर, जि. लातूर), लक्ष्मण प्रल्हाद पाटील (वय ३९, रा. रिव्हर व्ह्यू सोसायटी, कदमवाक वस्ती, लोणी काळभोर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यंची नावे आहेत.




# अत्याचाराचा प्रकार अत्यंत घृणास्पद : आ. रोहित पवार

## जामखेडमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार; दोघांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** माझ्या मतदारसंघात एका व्यावसायिकाच्या अल्पवयीन मुलीसोबत झालेला अत्याचाराचा प्रकार हा अत्यंत घृणास्पद आणि किळसवाणा असून या कृत्याचा निषेध आ. रोहित पवार यांनी फेसबुक पोस्ट करून केला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, जामखेड तालुक्यातील नान्नज याठिकाणी रविवार, दि. २९ जुन रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास अल्पवयीन मुलगी व तीची आई दुकानात आसताना त्या ठिकाणी आरोपी मनोज महादेव हुंबे (वय २५, रा. बोर्ले, ता. जामखेड) व त्याच्या सोबत त्याचा एक अल्पवयीन आरोपी मित्र असे दोघेजण दुकानात आले. अल्पवयीन मुलगा हा अल्पवयीन फीर्यादी मुलगी हिच्या वर्गातीलच आहे.

यानंतर सामान देण्यासाठी अल्पवयीन मुलगी व आरोपी हे त्यांच्या घराजवळील गोडाऊनमध्ये आले. यावेळी अल्पवयीन मुलाने त्या मुलीचे तोंड दाबले व दोन्ही हात पकडले. तर आरोपी मनोज हुंबे याने पिडीत अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला व घटनास्थळाहुन आरोपी पळुन गेले. यानंतर सदरचा घडलेला प्रकार पिडीत अल्पवयीन मुलीने आपल्या आईला सांगितला. त्यानंतर पिडीत मुलीच्या आई-वडिलांनी जामखेड पोलीस स्टेशनला धाव घेतली.

याप्रकरणी पिडीत अल्पवयीन मुलीने जामखेड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून मनोज महादेव हुंबे व त्याचा एक अल्पवयीन मित्र (दोघेही रा. बोर्ले, ता. जामखेड) या दोघांनवर जामखेड पोलीस ठाण्यात पोक्सो व अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आ. पवारांनी केला संताप व्यक्त

आ. रोहित पवार यांनी फेसबुक पोस्ट करित म्हटले आहे की, माझ्या मतदारसंघात एका व्यावसायिकाच्या अल्पवयीन मुलीसोबत झालेला अत्याचाराचा प्रकार हा अत्यंत घृणास्पद आणि किळसवाणा असून या कृत्याचा मी तीव्र निषेध करतो. यासंदर्भात पोलिस अधीक्षक घार्गे यांच्याशी बोलणं झालं असून एका आरोपीच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. तर दुसऱ्या आरोपीलाही तातडीने अटक करण्याबाबत पोलिस प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. पण अटक झाली नाही, तर ते प्रशासनाला परवडणार नाही. राज्यात महिला अत्याचाराच्या घटना का वाढत आहेत? गुन्हेगारांना कायद्याचा धाक नाही का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# अबब... पारनेरात डाळींबांवर चोरट्यांचा डल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : सध्या शेतकऱ्यांच्या डाळिंब पिकाला बाजारपेठेमध्ये विक्रमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना मोठे उत्पन्न मिळत आहे. शेतकऱ्यांच्या या कष्टाच्या पैश्यावरच काम धंदा न करता ऐशोरामी जीवन जगणारे चोरटे पारनेर तालुक्यात डाळींब चोरण्यास सक्रिय झाले आहेत. शेतकरी डोळ्यांत तेल घालून शेताची राखण करण्यात रात्रीचा दिवस करतोय.



पारनेर तालुक्यातील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने व आर्थिक झळ सोसत शेतात डाळींबाची शेती बाग बहरली आहे. डाळींबाची लागवड करण्यासाठी शेताची मशागत करणे, लागवडीसाठी महागडे रोपे आणून ती लावणे, खते घालणे, औषधे फवारणी ते डाळींब झाडांचे योग्य पद्धतीने संगोपन करणे व आलेले डाळींब फळांची निगा राखणे, एवढे महाकष्ट करून तोडणीस आलेले डाळींब फळे बाजारात विक्री करून आपल्या कष्टाचे चीज करून योग्य तो मोबदला पदरात पाडून, तो कुटुंबासाठी कारणी लावणे, हे प्रत्येक डाळींब उत्पादक शेतकऱ्याचे स्वप्न असते. पण दुसऱ्याच्या जीवावर जगणारे व मजा मारणारे चोरटे मात्र, शेतकऱ्यांनी आपल्या पोटच्या मुलाप्रमाणे जपलेली डाळींब शेती, रात्रीच्या अंधारात येऊन डाळींब फळे चोरून नेऊन शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळवण्याच्या घटना पारनेर तालुक्यात राजरोसपणे घडल्याचे दिसू लागली आहेत.

### डाळींब चोरांचा बंदोबस्त करा

डाळिंब चोरट्यांविरोधात संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यानी जरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. तरी त्याचा काहीही फायदा होईलच, असे नाही. पोलीस प्रशासनाने तत्काळ या डाळींब चोरांचा बंदोबस्त करावा व तालुक्यातील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी पुढे येऊ लागली आहे.

# येत्या हंगामात जास्तीत जास्त उसाचे गळीत करणार : माजी मंत्री गडाख

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** मशीनरीच्या दुरुस्तीची कामे मुदतीत आणि चांगल्या प्रकारे पूर्ण करावीत, जेणेकरून येणाऱ्या गळीत हंगामात जास्तीत जास्त ऊसाचे गळीत आपल्याला करता येईल, असे प्रतिपादन माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी केले.



मुळा सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ च्या येणाऱ्या गळीत हंगामाची पूर्वतयारी काल दि. ३० जून रोजी उत्साहात सुरू करण्यात आली असून कारखान्याच्या पहिल्या मिल रोलरचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी माजी मंत्री शंकरराव गडाख हे उपस्थित होते.

प्रारंभी, कारखान्याचे कार्यकारी संचालक शरद बेल्हेकर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर कारखान्याचे संचालक बाळासाहेब बनकर व बाबासाहेब भणगे यांच्या हस्ते मिल रोलरचे विधिवत पूजन करण्यात आले.

याप्रसंगी अध्यक्ष नानासाहेब तुवर, कडूबाळ कर्डिले, बाबुराव चौधरी, लक्ष्मण पांढरे, भाऊसाहेब मोटे, बापूसाहेब शेटे, बबनराव दरंदले, नारायण लोखंडे, बाळासाहेब परदेशी, कडूबाळ गायकवाड, रंगनाथ जंगले व सोपानराव पंडित यांसह आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप करताना, कारखान्याचे अध्यक्ष तुवर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कारखान्याचे सचिव रितेश टेमक यांनी केले.

# पाथर्डीत अवैध दारूचा साठा पकडला

## पोलिसांकडून ४.६५ लाखांची विदेशी दारू जप्त; दोघे जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तालुक्यातील एडके कॉलनी येथे दोन व्यक्तीकडून ४ लाख ६५ हजार १२० रुपयांची परराज्य निर्मित विदेशी दारू जप्त करण्यात आली. ही कारवाई प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यापूर्वीही त्यांनी पाथर्डीत अवैध मावा विक्रीवर मोठी धडक कारवाई करत लाखो रुपयांचा साठा जप्त केला होता. आता पुन्हा एकदा त्यांनी विदेशी दारूच्या अवैध विक्रीवर जोरदार कारवाई करून गुन्हेगारी प्रवृत्तीला दणका दिला आहे. काल, दि. ३० जून रोजी सकाळी पाथर्डी पोलिस ठाण्यात डीवायएसपी खाडे यांना गुप्त माहिती मिळाली की, एडके कॉलनीमध्ये काही व्यक्ती बेकायदेशीररीत्या विदेशी दारू विक्री करत आहेत. माहितीची खातरजमा झाल्यानंतर तातडीने एक पथक तयार करून सदरील ठिकाणी छापा टाकण्यात आला.

छाप्यादरम्यान काल्या उर्फ तौफीक निजाम शेख (वय २७, रा. जुनी पंचायत समिती रोड) आणि अल्ताफ रशीद शेख (वय २२, रा. इंदिरानगर) यांना पोलिसांनी अटक केली. एडके कॉलनी येथील घरात तळमजल्यावरील खोलीतून २७०० बाटल्या विदेशी दारू मिळून आल्या. बाजारमूल्यानुसार याची किंमत ४ लाख ६५ हजार १२० रुपये इतकी आहे. कारवाई दरम्यान कारवाई ठिकाणी नागरिकांची मोठी गर्दी पाहण्यासाठी होती. या गुन्ह्याच्या अनुषंगाने संबंधित दोघांविरोधात मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक विलास जाधव करत आहेत.

दरम्यान पाथर्डी शहरातील रॉयल स्टार पान टपरीवर धाड टाकून दोन धारदार कोयते व मावा तयार करण्याचे मशीन जप्त करण्यात आले. या प्रकरणात रंगनाथ दिलीप गायकवाड (वय २६, रा. हंडाळवाडी, ता. पाथर्डी) आणि ईशान हरुन शेख (वय २६, रा. कसबा पेठ, पाथर्डी) या दोघांना अटक करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे, प्रशिक्षणार्थी पोलीस



उपअधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलिस पथक व पाथर्डी पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. चौकशीत एकाने पान टपरी ही स्वतःची असल्याचे सांगितले व दुसरा युवक तेथे काम करत होता. टपरीच्या झडती दरम्यान प्लायवुडच्या ड्रॉवरमध्ये दोन धारदार लोखंडी कोयते सापडले. त्यानंतर पोलिसांनी अधिक तपास केला असता टपरीच्या पाठीमागे सुमारे शंभर मीटर अंतरावर असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये एक मावा तयार करणारे लोखंडी मशीन सापडले. या संपूर्ण कारवाईत दोन धारदार कोयते आणि मावा तयार करण्याचे मशीन असा एकूण मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

# शाळांना मैदानेच नाही

## शिक्षण विभागाचे दुर्लक्ष : विद्यार्थी खेळापासून राहतात वंचित




शिक्षण विभागातील गोंधळ (भाग-८)

**महेश रक्ताटे**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : जिल्ह्यातील काही शाळांमध्ये मैदाने नसल्याची बाब समोर येत आहे. असे असतानाही त्या शाळांवर माध्यमिकसह प्राथमिक शिक्षण विभागाकडून कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

शारीरिक विकास, खेळ-क्रीडा, मानसिक स्वास्थ्य या दृष्टीने शाळेतील मैदान अत्यंत आवश्यक आहे. शाळांना मान्यता देण्यापूर्वी मैदान, कुंपण, सुविधा अशा अटींचे काटेकोर पालन केले जाते. मात्र जिल्ह्यातील काही शाळांनी मान्यता घेताना मैदान नसल्याची बाब समोर आल्यानंतर शेजारील मोकळी जागा भाडे तत्वावर घेऊन मैदान असल्याने शिक्षण विभागाला दाखविलेले आहे. मान्यता मिळाल्यानंतर तो करार रद्द करून मुलांना खेळापासून वंचित ठेवले जात आहे. अहिल्यानगर शहराबरोबरच जिल्ह्यातील काही शाळांमध्ये हा प्रकार घडलेला आहे. परंतु याकडे शिक्षण विभागातील अधिकारी जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्याने पालकवर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

खेळाचे मैदान नसल्याने मुलांना पुरेसा व्यायाम मिळत नाही. लठ्ठपणा, थकवा, मधुमेहसारखे आजार लहान वयात होण्याचा धोका वाढतो. शरीराची लवचिकता, स्नायूंचा विकास होत नाही. सतत वर्गात बसून मुलांना कंटाळा, चिडचिड, एकाग्रतेचा अभाव जाणवतो. नैराश्य व चिंता यासारख्या समस्या उद्भवू शकतात. खेळांमधून मिळणारी ऊर्जा, आनंद आणि तणावमुक्ती यांचा अभाव राहतो. मेंदूला ऑक्सिजन कमी मिळाल्यामुळे ध्यान केंद्रित करणे कठीण जाते. मैदानात खेळल्याने मेंदू सक्रिय होतो, जे अभ्यासात मदत करते. ते होत नाही. विद्यार्थ्यांची उत्तरे लिहायची गती, उत्सुकता व आत्मविश्वास कमी होतो. मैदानी खेळांतून येणारा टीमवर्क, सहकार्य, नेतृत्व यांचा अनुभव मिळत नाही. एकमेकांशी जुळवून घेणे, इतरांचे ऐकणे, मतभेद सोडवणे या कौशल्यांचा विकास होत नाही. मुले एकमेकांपासून दूर राहत असल्याने एकटेपणा व असामाजिक वर्तन निर्माण होते. मैदानातील खेळांमुळे मिळणाऱ्या आनंदाचा अनुभव न आल्याने भावनिक ताण वाढतो. अपयश स्वीकारणे, हार सहन करणे या भावनिक कौशल्यांचा विकास होत नाही. काही मुलांमध्ये खेळ ही नैसर्गिक क्षमता असते. मैदान न मिळाल्याने ती व्यक्तच होत नाही. खेळातून भविष्य घडवता आले असते अशा मुलांचे स्वप्न मोडते.ही मैदान नसल्याने होणारी परिणाम आहेत.ही बाब लक्षात घेऊन शिक्षण विभागाने मैदाने नसणाऱ्या शाळांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### शाळांची तपासणी होत नाही

शाळा विद्यार्थ्यांसाठी किती सुविधा देते किती देत नाही, याची पडताळणी शिक्षण विभागाकडून होत असते. परंतु अशी तपासणी सध्या शिक्षण विभागाकडून होत नसल्याचे समोर आलेले आहे. त्यामुळे अनेक शाळांमध्ये मैदाने नसतानाही त्यांच्यावर कारवाई झालेली नाही.

### मैदाने नसणाऱ्या शाळांची यादी जाहीर करा

शिक्षण विभागाने ज्या शाळांना मैदाने नाहीत, अशा शाळांची यादी शिक्षण विभागाने जाहीर करणे गरजेचे आहे. त्यामुळे पालक अशा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आगामी काळात प्रवेश घेणार नाही.

# ‘डायनॅमिक’कडून निवृत्तीनाथ महाराज पालखीचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** ‘संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखीचे कर्जत शहरात आगमन होताच संपूर्ण शहर भक्तीमय वातावरणात न्हालं. याच पार्श्वभूमीवर डायनॅमिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक उत्साहात व जल्लोषात पालखीचे स्वागत केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही या शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान करून साक्षात विठ्ठल-रुक्मिणीचा अवतार साकारला होता. ढोल-ताशांच्या गजरात, ’पांडुरंग’च्या जयघोषात आणि नृत्यगायनाच्या माध्यमातून त्यांनी पालखीचे स्वागत करत वारकऱ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण निर्माण केले.

या उत्सवमय क्षणांत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी विद्यार्थ्यांबरोबर छायाचित्रे घेत उत्साहात सहभाग नोंदवला. शाळेचे संस्थापक, प्राचार्य, शिक्षकवृंद तसेच सर्व शालेय समिती सदस्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.



### विद्यार्थ्यांकडून अनोख्या पद्धतीने स्वागत

पालखीतील वारकरीही या विद्यार्थ्यांच्या आनंदात सहभागी होत देहभान विसरून नाचत होते. ही दृश्ये पाहणाऱ्यांच्या डोळ्यांत श्रद्धा, आनंद आणि अभिमानाची एक अनोखी छटा दिसत होती.डायनॅमिक इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे दरवर्षी जतन केल्या जाणाऱ्या या परंपरेतून विद्यार्थ्यांमध्ये भक्तिभावासोबतच सांस्कृतिक मूल्यांची जपणूक होत असल्याचे चित्र या अनोख्या स्वागत सोहळ्यातून स्पष्ट झाले.

# श्री सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंग श्रद्धेचे प्रतीक

## आ. आशुतोष काळे; परमपूज्य स्वामी वैशंपायनजी व संत-महंतांचे घेतले आशीर्वाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** परमपूज्य श्री श्री रवीशंकरजी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेच्या माध्यमातून हजारो वर्ष जुन्या असलेल्या श्री सोरटी सोमनाथच्या मुळ ज्योतिर्लिंगाचे दर्शन हे माझे परमभाग्य असून श्री सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंग आत्मबल आणि श्रद्धेचे प्रतिक असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी म्हटले आहे.

रविवार (दि.२९) रोजी कोपरगाव शहरातील साईबाबा तपोभूमी येथील महात्मा गांधी चॅरीटेबल ट्रस्टच्या हॉलमध्ये परमपूज्य श्री श्री रवीशंकरजी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेच्या माध्यमातून आणण्यात आलेल्या भगवान श्री सोरटी सोमनाथाचे मुळ ज्योतिर्लिंग भाविकांना दर्शनासाठी ठेवण्यात आले होते.



यावेळी आ. काळे व गौतम सहकारी बँकेच्या माजी संचालिका सौ. पुष्पाताई काळे यांनी श्री सोरटी सोमनाथच्या मुळ ज्योतिर्लिंगाचे मनोभावे दर्शन घेवून आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रमुख परमपूज्य स्वामी वैशंपायनजी व संत-महंतांचे आशीर्वाद घेतले हे याप्रसंगी आपल्या भावना आ. काळे यांनी व्यक्त केल्या.

आ. काळे म्हणाले की, बारा ज्योतिर्लिंगापैकी प्रथम असलेले सोरटी सोमनाथ ज्योर्तिलिंग मंदिरावर शेकडो वर्षापूर्वी मेहमूद गजनीने १८ वेळा आक्रमण करून मंदिराला लुटले व ज्योतिर्लिंग खंडित केले. परंतु तामिळनाडूच्या काही अग्निहोत्री पंडितांनी या ज्योतिर्लिंगाचे अवशेष जोपासले आणि शेकडो वर्ष या ज्योतिर्लिंगाची पूजा अर्चना केली व हे पवित्र रहस्य सुरक्षित ठेवले. याप्रसंगी संत-महंत, विविध क्षेत्रातील मान्यवर, आर्ट ऑफ लिव्हिंग व इस्कॉनचे सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते, कोपरगावकर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मंदिर आक्रमणांमध्ये अनेकवेळा उद्धस्त : काळे

गुरुदेव श्री श्री रविशंकरजीयांच्या माध्यमातून है ज्योतिर्लिंग जगाच्या सर्व लोकांना दर्शनासाठी पुन्हा प्रकट झाले असून ह्या पवित्र सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे समस्त कोपरगावकरांबरोबरच मलाही दर्शनाचा लाभ मिळाला. हे मंदिर आक्रमणांमध्ये अनेक वेळा उद्धस्त झाले, पण प्रत्येक वेळी ते नव्याने उभे राहिले असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले.

सोमनाथ मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नाही, तर हे आपल्या श्रद्धेचे, संस्कृतीचे आणि इतिहासाचे जिवंत प्रतीक आहे. भगवान शिवाच्या चरणी नतमस्तक होऊन मी जनतेसाठी सुख, समृद्धी व चांगले आरोग्य मिळावे, अशी प्रार्थना केली आहे.

**-आशुतोष काळे, आमदार**

# आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते दिंडीचे स्वागत



**अहिल्यानगर :** श्री दत्त दिंडी सेवा मंडळ व दत्त प्रेरणा भजनी मंडळ तसेच समस्त ग्रामस्थ देवगाव, तालुका संगमनेर आयोजित श्रीक्षेत्र देवगाव ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे नगरमध्ये मनपा हडको वसाहत, आकाशवाणी केंद्र येथे आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते आरती पूजा करून स्वागत करण्यात आले.

प्रोफेसर चौकात सर्व वारकऱ्यांचे भगव्या टोप्या व उपरणे घालून स्वागत करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक दिंडीत सहभागी झाले होते. दिंडी हडको वसाहतीत आल्यानंतर आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते दिंडीचे पूजन व महाआरती करण्यात आली.

यावेळी युवा नेते योगेश सोनवणे, किशोर कानडे, दत्तात्रय फटांगरे, राहुल साबळे, सचिन तनपुरे, द्वारकादास किंगर, भास्कर अकुबत्तीनं, सचिन महाजन, ज्ञानेश्वर कानडे आदींसह परिसरातील उपस्थित होत्या. दिंडीचा मुक्काम हडकोतच होता. या ठिकाणी रात्रीचा महाप्रसाद वारकऱ्यांना देण्यात आला. सकाळी नाष्ट्यानंतर दिंडी पुढे मार्गस्थ झाली.


वारकऱ्यांची सेवा केल्याने आत्मिक समाधान लाभते. त्याच्यात आपण प्रत्यक्ष देव पाहतो. आषाढी वारी म्हणजे वारकरी भक्तांनी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर पर्यंत केलेली पदयात्रा होय. वारकरी संप्रदायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आषाढी वारीमध्ये कोणी मोठा छोटा नसतो.

**- संग्राम जगताप, आमदार**

# भंडारदऱ्याचे शिल्लक पाणी वापरात आणा: औताडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** भंडारदरा कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात पावसाने खंड दिलेला आहे. मागील वर्षी भंडारदरा धरण पूर्ण क्षमतेने भरलेने कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात ऊस क्षेत्र वाढलेले आहे. त्यामुळे आज उसासारख्या पिकास मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज निर्माण झाली आहे. आज रोजी उन्हाळी आवर्तनातील दुसरे आवर्तन ३० जून च्या आत घेतल्याचा निर्णय जलसंपदा मंत्री विखे पाटील व जलसंपदा विभागाने घेतल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.



भंडारदरा व निळवंडे धरण मिळून चार टीएमसी पाणी मागील शिल्लक आहे. तसेच नव्याने धरणामध्ये पाच टीएमसी पाण्याची आवक झाल्याने एकूण नऊ टीएमसी पाणी धरणामध्ये आहे. साहजिकच मागील वर्षापेक्षा धरणाची यावर्षी परिस्थिती चांगली आहे. जलसंपदा मंत्री व जलसंपदा विभाग यांच्या योग्य नियोजनामुळे चार टीएमसी पाणी शिल्लक राहिले.

सदर शिल्लक राहिलेले पाणी उन्हाळी आवर्तन दोन म्हणून कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना दिल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून ऊस पिकासाठी प्रामुख्याने उपयोग होणारआहे. येत्या चार-सहा दिवसांमध्ये नगरपालिकेसाठी पिण्याचे आवर्तन घेणे गरजेचे असणार आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने ३० जून २०२५ च्या आत आवर्तनाचा निर्णय घेतल्यास तुटीच्या खोऱ्यातील चार टीएमसी पाणी वापरणे शक्य होणार आहे.

वास्तविक आवर्तनाचा निर्णय हा ३० जून २०२५ नंतर घेतल्यास वापर झालेले पाणी हे जायकवाडी धरणाच्या हिशोबात धरण्यात येईल. घेतलेल्या आवर्तन कालावधीमध्ये सुदैवाने पाऊस मोठ्या प्रमाणात झाल्यास कार्यक्षेत्रातील टेल टँक, पाझर तलाव, गावतळी भरण्यास मदत होईल. तरी जलसंपदा विभागाने भंडारदरा कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या हितरक्षणार्थ ३० जून २०२५ च्या आत आवर्तनाचा निर्णय घेऊन शेती क्षेत्रासह पिण्याच्या पाण्यासाठी मागील त्या ग्रामपंचायतींना पाणी द्यावे.

**- अनिल औताडे, जिल्हाध्यक्ष : शेतकरी संघटना**

# पाथर्डीत अल्पवयीन मुलीचा विवाह रोखला

### प्रशासनाच्या वेळीच हस्तक्षेपाने संभाव्य विवाह थोपवला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी नगरपरिषद हद्दीतील मोहटादेवी रोड परिसरातील तनपुरवाडी शिवारात असणाऱ्या पालवे वस्ती येथे एका अल्पवयीन मुलीचा विवाह करण्याची तयारी सुरू असताना नगरपरिषद प्रशासन आणि पोलिस दलाच्या संयुक्त कारवाईने हा विवाह रोखण्यात आला.

संबंधित कुटुंबीयांनी यास साखरपुडा म्हटले असले तरी, प्रत्यक्षात हा विवाह करण्याचाच प्रयत्न होता, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.शनिवारी या ठिकाणी विवाहपूर्व कार्यक्रमाच्या तयारीची गोपनीय माहिती पोलिसांना मिळताच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेचे सहाय्यक ग्रंथपाल अंबादास साठे हे आणि पोलीस हवालदार भगवान गरगडे, सचिन गणगे, सचिन जाधव यांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सविस्तर चौकशी करून कार्यक्रम थांबवला.



अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी लेखी जबाबात नमूद केले की, मुलगी केवळ १६ वर्ष ३ महिने वयाची असून, तिचे १८ वर्ष पूर्ण झाल्यावरच विवाह करण्यात येईल. तसेच कायद्याचे उल्लंघन केल्यास कारवाईस पात्र राहिल, याची जाणीवही त्यांनी व्यक्त केली.

### ... यापूर्वीही रोखले होते बालविवाह

काही दिवसांपूर्वी याच परिसरात अशाच प्रकारे दोन अल्पवयीन विवाह प्रशासनाने रोखले होते. सतत घडणाऱ्या घटनांमुळे प्रशासनाने अशा प्रकरणांकडे अधिक गांभीर्याने लक्ष केंद्रित केले असून, अल्पवयीन विवाह रोखण्यासाठी जनजागृती आणि कायदेशीर कारवाई दोन्ही सुरू आहेत.

# ... चक्क तीन वर्षांपासून शाळेला शिक्षकच नाही

### गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या दालनात विद्यार्थ्यांनी भरवली शाळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यामधील शेगुड या गावांमधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये मागील तीन वर्षांपासून शिक्षक नाही. यामुळे त्या शाळेमधील विद्यार्थ्यांनी कर्जत पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी यांच्या दालनामध्ये शाळा भरवली.



गटशिक्षण अधिकारी यांच्या दालनामध्ये शाळा भरवली.

कर्जत तालुक्यातील शेगुड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये मागील तीन वर्षांपासून शिक्षक मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. यामुळे संतप्त पालक आणि विद्यार्थ्यांनी आज थेट पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी यांच्या दालनामध्ये शाळा भरवली. व आम्ही रोज शाळेमध्ये जातो पण शिक्षक नसल्यामुळे केवळ भात खाऊनच घरी येतो असे विद्यार्थी यावेळी म्हणाले.

यावेळी सरपंच शांतीलाल मासाळ, संदीप शेगडे, राजेंद्र नलवडे, बबन शिरसाट, भाऊ कोकाटे, माधव शेगडे, मंगेश गोरे, गणेश पांढरे व ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी त्याच ठिकाणी जोरात पाढे म्हणण्यास सुरुवात केल्यामुळे सर्व पंचायत समिती दणाणून सोडली होती.

# चौरस चौकस व्यवस्थापनाने डाळींब शेती यशस्वी

### बी. टी. गोरे; तिसगाव येथे डाळींब उत्पादक शेतकऱ्यांची कार्यशाळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** लागवडीसाठी निचरा होणारी जमीन निवड बुरशीनाशकांसह जीवाणु नाशकांची अमावस्या पौर्णिमेच्या संधीवरील फवारणी तसेच सेंद्रीय रासायनिक खतांचा संतुलित वापर हवा. एक उद्योग म्हणुनच याकडे पाहिले जावे. चौरस चौकस व्यवस्थापनानेच डाळींब शेती यशस्वी होते, असे प्रतिपादन डाळींब चिकीत्सक मार्गदर्शक बी. टी. गोरे यांनी केले.



पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथे रविवारी बारा गावांतील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांचे एकदिवशीय कार्यशाळेत ते बोलत होते. प्रकाश राऊत,बाळासाहेब म्हस्के व्यासपीठावर होते. डाळींब बाग निरोगी ठेवण्यासाठी रोगांचे योग्य वेळी निदान आणि पुरक उपाय व्यवस्थापन करणे आवशयक ठरते. तेलकट डागांचा रोग अर्थात तेल्या रोग सर्कोस्पोरा नावाच्या बुरशीमुळे होतो. सुरुवातीस काही झाडांवर लक्षणे दिसतात.

प्रास्ताविक प्रसाद म्हस्के यांनी केले. सूत्रसंचालन भाऊसाहेब शेलार यांनी केले. तर बाळासाहेब म्हस्के यांनी आभार मानले.

यावेळी भारत पाखरे, रामदास मरकड, प्रसाद दहिफळे, रामनाथ गर्जे, भारत काकडे, सिकंदर शेख, विजय राजळे, अशोक भगत आदींसह डाळींब उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

आज तंत्रज्ञान प्रगत आहे. वेळीच त्यांवर प्रतिबंध केल्यांस उर्वरित बागेचा धोका टाळता येतो. जमिनीतुन व फवारणी मधुन पोषक आहाराची कमतरता भासल्यामुळे तेल्या रोग जास्तीचा सुरु होतो. शारीरिकदृष्ट्या कॅन्सर सारखाच हा उपद्रवी आहे. लागण लक्षणे आढळताच व अपाय होण्याचे आधी उपाय हे सुत्र आचरणात ठेवावे लागेल.

**- बी. टी. गोरे, डाळींब चिकीत्सक**

# सहकार पुरस्काराकरिता सहकारी संस्थांनी प्रस्ताव पाठवावे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार चळवळीच्या विकासात उत्कृष्ट कामकाज करणाऱ्या सहकारी संस्थांना महाराष्ट्र शासनामार्फत २० एप्रिल २०१२ व ११ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरून सहकार पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील सहकारी संस्थांच्या कामगिरीच्या आधारावर सहकारी संस्थांची पुरस्कारासाठी निवड करण्याचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी दिली.

# ‘राऊतबाबा’ पतसंस्थेच्या अध्यक्षपदी राऊत

## देवराज शेंडकर यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** राऊतवाडी येथील देवऋषी राऊतबाबा पतसंस्थेच्या अध्यक्षपदी आनंदराव राऊत तर उपाध्यक्षपदी देवराज शेंडकर यांची बिनविरोध निवड झाली. ही निवड शांततेत व पारदर्शक वातावरणात पार पडली.



सामाजिक भान जपत कार्य करणाऱ्या संस्थेच्या संचालक मंडळात आनंदराव राऊत, देवराज शेंडकर, प्रभाकर राऊत, भाऊसाहेब राऊत, सुदाम जाधव, उषा राऊत, शिवाजी राऊत, राजेंद्र रणदिवे व राजू राऊत यांची संचालकपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

संस्थेचे सुमारे ४०० सभासद असून वार्षिक आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात आहे. ठेवी आणि कर्जवाटप वाटपाचा दर्जाही उल्लेखनीय असून संस्थेचा कारभार पूर्णपणे पारदर्शकपणे राबवला जातो. संस्थेची स्थापना होऊन सुमारे ३० वर्षे झाली असून संस्थेच्या इतिहास सातत्याने संचालक मंडळाची निवडणूक झाली आहे. यावर्षीही सर्व संचालकांची बिनविरोध निवड झाली आहे. ही संस्था तालुक्यात नव्हे, तर जिल्ह्यात संस्था, सभासद व ग्रामस्थांमध्ये असलेला परस्पर विश्वास दर्शवते.



संस्थेच्या निवडणुक सहाय्यक निबंध विकास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुक अधिकारी म्हणून शुभांगी सराफ यांनी सुयोग्यपणे पार पाडले. सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून रामभाऊ राऊत, विलास रणदिवे व खोसे यांनी सहकार्य केले.

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आनंदराव राऊत यांनी सर्व सभासदांचे आभार मानत, संस्थेच्या प्रगतीसाठी व सभासदांच्या हितासाठी निःस्वार्थपणे कार्य करणार आहोत, असे शब्द दिला.

# आ. तांबेंमुळे नॅशनल यंग ग्राउंडला एक कोटींचा निधी

## नॅशनल यंग ग्राउंडचे काम कोणी रोखले, हे सर्वांना माहीत : शेख

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहर व तालुका हा एक परिवार म्हणून राहिला. मात्र काही लोक राजकारणासाठी समाजात तेढ निर्माण करत असून यंग नॅशनल ग्राउंडच्या विकास कामासाठी आमदार सत्यजित तांबे यांच्या पाठपुराव्यातून एक कोटी रुपयांचा निधी मिळाला. काम सुरू झाल्यानंतर मात्र हे काम कोणी रोखले हे सर्वांना माहीत आहे असे अल्पसंख्यांक काँग्रेसचे अध्यक्ष जावेद शेख यांनी म्हटले आहे.



जावेद शेख यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली या विभागाच्या विकासाकरता सातत्याने विविध योजना राबवल्या गेल्या. एसटीपी प्लांट ची जागा माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी बदलवली. याबाबत अनेक अफवा आणि चुकीचे गैरसमज निर्माण केले. सर्व जनता आपली आहे. या हेतूने येथील नेतृत्व काम करत आहे. मात्र काही लोक यामध्ये तेढ निर्माण करत आहे.

यंग नॅशनल ग्राउंड हे मध्यवर्ती ठिकाणी असून या ग्राउंडच्या विकासाकरता आमदार सत्यजित तांबे यांनी पाठपुरावा करून एक कोटी रुपयांचा निधी मिळवला. कामही सुरू केले. मात्र महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर फक्त राजकारणासाठी हे काम रोखले गेले. हे सर्व तरुणांना माहीत आहे. त्यामुळे कोणी या भागांमध्ये येऊन भूलथापा देऊ नये. असे सांगताना नवीन लोकप्रतिनिधीने नवीन निधी आणावा आणि कामे करावी.

संगमनेर नगरपालिकेने स्वच्छता आणि विकास कामांमधून राज्यात आपला लौकिक निर्माण केला आहे. हे सर्वश्रुत आहे आणि त्यामुळे केंद्रात आणि राज्यात भाजपा प्रणित सरकार असताना सुद्धा वेळोवेळी नगरपालिकेला स्वच्छतेची अनेक पारितोषिक मिळाली आहे.

संगमनेरचा आज राज्यामध्ये जो लौकिक आहे तो सर्व चांगल्या कामामुळे आहे. त्यामुळे राजकारणासाठी काहीही आरोप करणे हे अत्यंत चुकीचे असून संगमनेरची ही परंपरा नाही. चुकीच्या भूलथापा देऊन जनतेच्या मनात गैरसमज निर्माण करू नये असेही शेख यांनी म्हटले आहे.

### .... यावरून राजकारण करणे दुर्दैवी

स्वच्छ व सुंदर शहर असणाऱ्या संगमनेरचा लौकिक या अस्वच्छतेमुळे कमी होणार असून या अस्वच्छतेमुळे नागरिक वैतागले आहे. याबाबत अधिक सतर्कतेने काम करण्यासाठी विविध प्रभागांमधील सर्वपक्षीय नागरिकांनी नगरपालिकेला सुचवले आहे. यासाठी विद्यमान लोकप्रतिनिधी यांनी ही स्वच्छता तातडीने करावी यासाठी प्रशासनाला सूचना करायला पाहिजे. कारण जागोजागी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. डासांचे प्रमाण वाढले घंटागाडी वेळेवर येत नाही. असे असताना यावरून राजकारण करणे हे दुर्दैवी असल्याचे जावेद शेख म्हणाले.

# कुटुंबात संस्कार देणारी माता निर्माण करणार

## डॉ. अनुराधा यादव; विश्व मांगल्य सभेच्या जनप्रतिनिधींची शिर्डीत बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** देशामध्ये ५८ लाख जनप्रतिनिधींचे परिवार आहेत. यामध्ये संसद सदस्य, विधानसभा सदस्य, जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य, नगरसेवक अशा लोकप्रतिनिधींच्या कुटूंबियाचा समावेश आहे. जनप्रतिनिधींचे कुटूंब हे लाखो लोकांचे असते. समाजा करीता ही कुटूंब प्रेरणास्थान व्हावेत, या उद्देशाने आम्ही कार्य करीत आहोत. कुटूंबातील मातृशक्तीला केंद्रीभूत माणून समाजात होणारे बदल अभ्यासून त्यादृष्टीने प्रत्येक कुटूंबात संस्कार देणारी माता निर्माण करण्याचे कार्य आम्ही येणाऱ्या काळात करणार आहोत. असे विश्व मांगल्य संघटनेच्या अखिल भारतीय संयोजिका डॉ. अनुराधा यादव यांनी सांगितले. विश्व मांगल्य सभेच्या अखिल भारतीय जनप्रतिनिधींची दोन दिवसीय बैठक शिर्डी येथे संपन्न झाली. या बैठकीनंतर पत्रकारांशी वार्तालाप करताना यादव बोलत होत्या.

### परिवारांना संस्कृतीचे ज्ञान देणार: विखे

उत्तर महाराष्ट्राच्या संयोजिका धनश्री विखे पाटील यांनी ४ वर्षांनी ही सभा शिर्डी येथे घेण्याची संधी मिळाली असल्याचा अभिमान व्यक्त करुन, दोन दिवसांच्या बैठकीमध्ये भारतीय संस्कृतीला पुढे घेवून जाण्याच्या दृष्टीने असंख्य परिवारांना संस्कृतीचे ज्ञान देण्याचे कर्तव्य आम्ही करणार आहोत. पुढची पिढी घडविण्यामध्ये मातृशक्तीचा वाटा खुप मोठा असतो. त्यावरच लक्ष केंद्रीत करुन, आगामी काळात कार्य करण्याचा निर्धार या जनप्रतिनिधी सभेत झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीस देशभरातील १३ प्रांतामधील महिला जनप्रतिनिधी उपस्थित होत्या. या परिषदेचे उद्घाटन विश्व मांगल्य सभेचे केंद्रीय पराम र्शदाता प्रशांत हरतालकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी राष्ट्रीय सहसंघटन मंत्री वृषाली जोशी, सह संघटन मंत्री पुजा देशमुख, गायत्री लोमटे, अखिल भारतीय संपर्क प्रमुख शुभांगी मेंढे, माजी केंद्रीय राज्यमंत्री मिनाक्षी लेखीजी, उत्तर महाराष्ट्राच्या संयोजिका धनश्री विखे पाटील याप्रसंगी उपस्थित होत्या.

मातृशक्तीला केंद्रीभूत मानून समाजातील हजारो कुटूंबियांना संस्कार आणि सामर्थ्यांतून जोडण्याचे महत्वपूर्ण कार्य विश्वमागंल्य सभेच्या माध्यमातून करण्याचा संकल्प शिर्डी येथील अखिल भारतीय जनप्रतिनिधी सभेत करण्यात आला. दोन दिवसांच्या बैठकीत वर्षभरातील कार्यक्रम आणि संघटन कार्यक्रम ाची योजना निश्चित करण्यात आली असल्याची माहीती विश्व मांगल्य संघटनेच्या अखिल भारतीय संयोजिका डॉ.अनुराधा यादव यांनी दिली. सहसंघटन मंत्री पुजा देशमुख यांनी याप्रसंगी समाजातील असंख्य परिवार जोडण्यासाठी छोटे रोपटे आम्ही



लावले आहे. त्याचा वटवृक्ष करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. प्रत्येक कुटूंबात चांगले संस्कार आम्हाला द्यायचे आहे. कुटूंबा बरोबरच जनप्रतिनिधींचे कार्यक्षेत्रही सांभाळायचे आहे. त्यादृष्टीनेच भविष्यात संघटनात्मक कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# युरिया खताचे व्यवस्थित वाटप करावे

## आमदार खताळ यांचे कृषी अधिकाऱ्यांना निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** खरीप हंगामासाठी सरकारने संगमनेर तालुक्यासाठी मोठ्या प्रमाणावर युरिया खताचा पुरवठा केला आहे. मात्र काही ठिकाणी युरिया मिळत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. तालुक्यातील शेतकरी युरिया खतापासून वंचित राहणार नाही याची दक्षता कृषी अधिकाऱ्यांनी घ्यावी असे निर्देश आमदार अमोल खताळ यांनी दिले आहे.



संगमनेर तालुक्यात युरिया खताचा पुरेसा पुरवठा असतानाही शेतकऱ्यांच्या तक्रारी येत असल्याने या पार्श्वभूमीवर आमदार खताळ यांनी कृषी अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत बोलताना त्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले. सर्व कृषी सेवा केंद्र सहकारी संस्था यांचा समन्वय साधून युरियाचा साठा निश्चित करा, शेतकऱ्यांना तांत्रिक कारणाने युरिया खत मिळण्यास काही अडचणी येत असेल तर त्यावर तात्काळ उपाययोजना करावी आणि शेतकऱ्यांना युरिया खत उपलब्ध करून द्यावे.

संगमनेरच्या कृषी विभागाला आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली ४११ मेट्रिक टन युरिया खत प्राप्त झाले होते. त्यातील २०५ मेट्रिकटन युरिया खताचे वितरण पूर्ण झाले आहे. संपूर्ण तालुक्यातील विविध कृषी सेवा केंद्रे आणि विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमार्फत शेतकऱ्यांना वितरित करण्यात आलेला आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात बालक वाचले

## आजोबांचे मोठे धाडस; कोल्हे यांनी घेतली भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** तालुक्यातील येसगाव सुराळकर वस्ती येथे बिबट्याच्या हल्ल्यात चार वर्षीय कुणाल अजय आहेर हा चिमुकला गंभीर जखमी झाला आहे. सदर धक्कादायक घटना तरवडी (टाकळी फाटा) परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

आहेर परीवार हा प्रशांत सुराळकर यांच्या शेतावर राहण्यास असून कुणाल हा आपल्या आईच्या मागे शेताच्याकडेने जात असताना त्याला बिबट्याने झडप घालून उसाच्या शेतात खेचून नेत असताना मुलाचा आवाज अचानक बंद झाल्याने आईने मागे बघितले व मदतीसाठी



आरडाओरड केली. यावेळी त्याला वाचवण्यासाठी त्याचे आजोबा मच्छिंद्र आहेर यांनी मोठे धाडस दाखवत बिबट्यावर झेप घेऊन त्याला पळवून लावले. जखमी बालकाला उपस्थित रहिवाशांच्या मदत्तीने तात्काळ उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले असून फडके हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

आजोबांच्या धाडसाने बालकाचा जीव वाचला असून परिसरात त्यांच्या धाडसाचे कौतुक होत आहे. घटनेची माहिती मिळताच माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी जखमी बालकाची व त्याच्या कुटुंबियांची भेट घेतली व तब्येतीची चौकशी केली. डॉक्टरांशी चर्चा करत उपचाराबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी डॉ. रोशन डागा, कोपरगाव वनपाल भगवानराव जाधव, वनरक्षक प्रतीक गजवार,वन परिक्षेत्र अधिकारी निलेश रोडे, वनरक्षक राहता एस एस साखरे, कोपरगाव वनरक्षक ए. एल. किंकर, मुलाचे आजोबा मच्छिंद्र आहेर, वडील अजय आहेर, आई उज्वला आहेर उपस्थीत होते.

बिबट्याच्या दहशतीमुळे स्थानिक नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, प्रशासनाने या बाबत तातडीने आणि प्रभावी पावले उचलण्याची गरज आहे घटना दिवसा उजेडी घडली म्हणून तातडीने मदत झाली अपरात्री अशा घटना अधिक धोकादायक ठरतात. त्यामुळे सर्वांनीच अधिक सतर्क राहावे आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घेण्याबाबत आवाहन केले.

# हॉटेल साई सागर येथे छापा

## ५५ हजार ३९० रूपयांचा मुद्देमाल केला जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**



**आश्वी :** पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना अहिल्यानगर जिल्ह्यातील कारभार हाती घेताच जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करण्याची घोषणा केली. त्याकामी त्यांनी पोलीस उपअधिक्षक संतोष खाडे यांना विशेष जाबाबदारी देत एक पथक तयार केले आहे. या पथकाने नुकताच संगमनेर तालुक्यातील आश्वी पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या सादतपुर (ता. संगमनेर) हॉटेल साई सागर येथे छापा टाकत ४२ हजार ९० रूपयांची विदेशी दारू तसेच १३ हजार ३०० रुपयांचा असा एकूण ५५ हजार ३९० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

अतिष भाऊसाहेब गायकवाड वय ४० वर्ष राहणार विठ्ठलनगर, लोणी बुद्रुक (ता. राहाता) यांच्या सादतपूर शिवारातील हॉटेल साई सागर येथे छापा टाकत ४२ हजार ९० रूपयांची विदेशी दारू तसेच १३ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केली.

# ऊस रोपे व्यवस्थापनावर कार्यक्रम

## कृषक गटासाठी प्रात्यक्षिक व मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** कोल्हार (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) ऊस शेतीमध्ये उत्पादन वाढ व शाश्वत शेतीच्या दृष्टीने योग्य रोपे व्यवस्थापन व आधुनिक लागवड तंत्रज्ञान याची समृद्ध माहिती देण्यासाठी कृषक गटाच्या वतीने कृषी विज्ञान केंद्र, पायरेंस बाभळेश्वर येथे विशेष प्रात्यक्षिक व प्रशिक्षण कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले.

या अभ्यासात्मक सत्रात कृषी विद्या विभागाचे शास्त्रज्ञ व प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख आणि मृदविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ शांताराम सोनवणे यांनी ऊस लागवडीचे विविध पैलू सम जावून सांगितले



,देशमुख यांनी ऊसाच्या दर्जेदार रोपांची निवड, लागवडीची योग्य वेळ, अंतर ठेवणे, साचलेल्या पाण्याचे व्यवस्थापन व रोगप्रतिकारक तंत्रांचा उपयोग या बाबींवर भर दिला. त्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन लागवडीपूर्वीची तयारी, रोपे लावण्याची पद्धत व त्यासाठी लागणारी औजारे याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

कार्यक्रमास कृषक गटाचे अनेक सदस्य उपस्थित होते, त्यांनी शास्त्रज्ञांशी थेट संवाद साधत आपल्या शंकांचे निरसन केले. शेतकऱ्यांनी सांगितले की, ''अशा उपक्रमांमुळे शास्त्रीय दृष्टिकोन विकसित होतो व उत्पादनक्षमता वाढीस मदत होते.'' कार्यक्रमाचे संयोजन आणि नियोजन कृषक गटाच्या पुढाकाराने करण्यात आले असून, भविष्यात अशा प्रकारची प्रशिक्षण कार्यशाळा इतर पीकांसाठीही आयोजित करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. शास्त्रज्ञ सोनवणे यांनी जमिनीचे पोषणमूल्य, सेंद्रिय घटकांचा वापर, माती परीक्षणाचे महत्त्व व जमिनीच्या आरोग्याचे व्यवस्थापन यावर सविस्तर मार्गदर्शन केले. ऊस शेतीत मृदविज्ञानाचा अभ्यास कसा उपयुक्त ठरतो, याचे समर्पक उदाहरणांसह स्पष्टीकरण दिले.

# साकत येथे होणार पॉलिटेक्निक कॉलेज

**जनता आवाज वृत्तसेवा**



**जामखेड :** जामखेड तालुक्यातील साकत येथिल चेतना सेवा संस्था संचलित इंदिरा पॉलिटेक्निक कॉलेजला राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे. विशेष म्हणजे शासनाच्या निर्देशानुसार मुलींना मोफत प्रवेश आहे, मात्र संस्थेला वीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल या पॉलिटॅक्निक कॉलेजला प्रवेश घेणाऱ्या मुलांना देखील यावर्षी मोफत प्रवेश देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा डॉ. पल्लवी सुहास सुर्यवंशी यांनी दिली.

तांत्रिक आणि व्यावसायिक क्षेत्रात एक मजबूत करिअर घडवण्यासाठी अनेक विद्यार्थी दहावी नंतर पॉलिटेक्निक कोर्सेस निवडतात. दहावीनंतर पॉलिटेक्निक डिप्लोमामध्ये प्रवेश घेतल्याने उत्तम करिअर संधी उपलब्ध होऊ शकतात. आणि हीच संधी तुम्हाला आता जामखेड तालुक्यात म्हणजे शहराच्या जवळ साकत या ठिकाणी असलेल्या चेतना सेवा संस्था संचलित इंदिरा पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये मिळणार आहे. कारण या कॉलेजला नुकतीच मंजुरी मिळाली आहे.

# गणेश भांड यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची होती उपस्थिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** देवळाली प्रवरा येथील चैतन्य उद्योग समुहाचे अध्यक्ष गणेश भांड यांनी रविवारी रात्री शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे.

विखे समर्थक म्हणून ओळख असलेल्या गणेश भांड यांची शिंदे गटात प्रवेश करण्याबाबत वरीष्ठ पातळीवर चर्चा सुरू होती. त्यानुसार काल हा प्रवेश सोहळा मंत्री उदय सावंत यांच्या निवासस्थानी पार पडला.

यावेळी जुन्नरचे आ. शरद सोनवणे, आ. मनीषा कायंदे, दक्षिण जिल्हाध्यक्ष बाबूशेठ टायरवाले, शिवसेना अध्यात्मिक आघाडी जिल्हाध्यक्ष संपत जाधव,पांडुरंग महाराज वावीकर, शहरप्रमुख गंगाधर सांगळे आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते शिवसेना पक्षाचा पंचा घालून गणेश भांड यांचे पक्षात स्वागत करण्यात आले.

यावेळी संदीप भांड, गोपाल शिंदे प्रमोद बर्डे, संतोष येवले, संतोष घाडगे, कृष्णा भुजाडी, अर्जुन शेटे,चांगदेव खांदे, सुनील भांड, निलेश कुंभार,प्रतीक घोलप,गौरव भांड, सुमेध भांड, सोमा इथापे, सलीम शेख, कृष्णा कोबरणे, किशोर मोरे, अशोक गावडे, राजेंद्र सांगळे, सीताराम येवले, हरिभाऊ हापसे, रवींद्र बोरुडे, किरण देशमुख आदींसह कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# फुटबॉल रेफ्री प्रशिक्षण शिबिरास सुरूवात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** फुटबॉल खेळाडूंसह उत्तम प्रशिक्षक घडविण्याच्या उद्देशाने अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटना आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय फुटबॉल पंच (रेफ्री) प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ झाले आहे. या शिबिराला युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

या शिबिराचे उद्घाटन जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले. यावेळी अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नोएल पारगे, फिजिकल डायरेक्टर डॉ. सॅवियो वेगास, जिल्हा फुटबॉल संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, सचिव रौनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ आदी मान्यवर उपस्थित होते.




अहमदनगर महाविद्यालय येथे हे प्रशिक्षण सुरु असून, युवकांमध्ये फुटबॉलची आवड वाढवण्यासह, प्रशिक्षित आणि पात्र रेफ्री तयार करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकून या शिबिराजे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा फुटबॉल संघटनेमार्फत आयोजित करण्यात आलेले हे दुसरे प्रशिक्षण शिबिर आहे. यामध्ये जिल्ह्यातील विविध भागातून २५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले असून, त्यांना फुटबॉल नियमांचे सखोल प्रशिक्षण दिले जात आहे. यामध्ये थियरी बरोबरच प्रत्यक्ष मैदानावर प्रात्यक्षिके, निर्णय क्षमतेचा विकास तसेच रेफ्रीच्या भूमिकेतील जबाबदाऱ्या यांचे प्रशिक्षण समाविष्ट आहे.

# संगमनेरातील शेतकऱ्यांसाठी युरिया उपलब्ध

## लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या सूचनेनंतर प्रशासनाला आली जाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** सध्या खरीप हंगाम सुरू तालुक्यातील बहुतांश पेरणी पूर्ण झाली असून शेतकऱ्यांना युरियाची मोठी अडचण निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांना तातडीने युरिया उपलब्ध करून देण्याबाबत महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी प्रशासनाला सूचना केल्यानंतर कृषी विभागाकडून शेतकऱ्यांसाठी युरिया उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीवरून काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी प्रशासनाला बफर स्टॉक मधील ५० टक्के युरिया तातडीने शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या. शेतकरी हा जगाचा पोशिंदा असून त्याला सरकारने सातत्याने मदत केली पाहिजे ही भूमिका माजी मंत्री थोरात यांनी कायम मांडली आहे.



शेतकऱ्यांना आसमानी आणि सुलतानी अशा दोन्ही संकटांना सामोरे जावे लागत असून अनेकदा चांगली पिके असूनही भाव मिळत नाही. शासनाने हमीभाव जाहीर करू असे अनेकदा सांगितले मात्र हमीभाव दिलेला नाही. शेतकरी हा कायम संकटात आहे .त्याला शासनाने काय मदत केली पाहिजे, ही भूमिका माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची राहिली आहे. याचबरोबर महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार अशी घोषणा केली होती. ती कर्जमाफी ही तातडीने करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### महाराष्ट्राचे सर्वात यशस्वी कृषिमंत्री

महाराष्ट्राचे सर्वात यशस्वी कृषिमंत्री म्हणून बाळासाहेब थोरात यांनी गौरवास्पद कामगिरी केली असून सहा वर्ष राज्याचे कृषिमंत्री पद भूषवताना या कार्यकाळात सर्वाधिक कृषी उत्पन्न झाले याचबरोबर शेतकऱ्यांसाठी महापिक अभियान, १ लाख शेततळी, विद्यापीठे बांधावर असे अनेक सातत्याने उपक्रम राबवले असून कृषी खात्यामध्ये त्यांनी केलेल्या ऐतिहासिक कामामुळे महाराष्ट्रभर लोकप्रिय कृषी मंत्री म्हणून त्यांच्या कार्यकाळाची नोंद आहे. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळामध्ये शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंतची विन अट कर्जमाफी देण्यासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचा सर्वाधिक पुढाकार राहिला असल्याचे प्रगतशील शेतकरी रमेश गुंजाळ,( खांडगाव) यांनी म्हटले आहे.



माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी प्रशासनाला व सरकारला राज्यातील शेतकऱ्यांना व संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना बफर स्टॉक मधून ५० टक्के युरिया उपलब्ध करून देण्यासाठी पत्र दिले होते. या मागणीचा विचार करून कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना ५० टक्के युरिया उपलब्ध करून देण्यात आली आहे.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या प्रयत्नामुळे शेतकऱ्यांना युरिया उपलब्ध होणार असल्याने शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# संपादकीय

## न्यूयॉर्कच्या मतदारांना हिंदीतून आवाहन!

'बंधू आणि भगिनींनो! या निवडणुकीला फक्त वीस दिवस उरले आहेत आणि निवड माझ्या आणि अँड्यू कुओमो यांच्यापैकी एक आहे,' हे शब्द होते जोहरान ममदानी यांचे. इंग्रजी भाषिक अमेरिकेत ते हिंदी बोलून स्वतःसाठी मते मागत आहे. काही दिवसांपूर्वी, त्यांनी लोकांना त्यांच्या बाजूने मतदान करण्यास सांगण्यासाठी हिंदीत एक व्हिडीओ बनवला. त्यानंतर हा व्हिडीओ भारतात 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाला. आता न्यूयॉर्क शहराच्या महापौरपदाच्या डेमोक्रॅटिक उमेदवाराच्या प्राथमिक निवडणुकीत अँड्यू कुओमो यांनी जोहरान ममदानीसमोर पराभव स्वीकारला आहे. हा एक मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. कुओमो म्हणाले, की ३३ वर्षीय 'डेमोक्रॅटिक सोशलिस्ट' जोहरान ममदानी यांनी प्राथमिक निवडणूक जिंकली आहे आणि आता आम्ही सध्याच्या परिस्थितीचे मूल्यांकन करून पुढील निर्णय घेऊ. निवडणूक निकालांच्या अधिकृत घोषणेनंतर, न्यूयॉर्कमधील महापौरपदाच्या निवडणुकीत ममदानी हे पहिले मुस्लिम उमेदवार बनून इतिहास रचतील. तसेच, जर ममदानी नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीत विजयी झाले, तर ते जगातील सर्वांत श्रीमंत शहर असलेल्या न्यूयॉर्कचे पहिले मुस्लिम आणि पहिले दक्षिण आशियाई वंशाचे महापौर बनतील. जोहरन क्वामे ममदानी यांचा जन्म १९९१ मध्ये युगांडाची राजधानी कंपाला येथे झाला. ममदानी यांच्याच्या वडिलांनी त्याला क्वामे हे मधले नाव दिले, ते क्रांतिकारी आणि घानाचे पहिले पंतप्रधान क्वामे नक्रुमा यांच्या नावावरून. ममदानी हे प्रसिद्ध भारतीय-अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक मीरा नायर आणि कोलंबिया विद्यापीठाचे प्रसिद्ध प्राध्यापक महमूद ममदानी यांचे पुत्र आहेत. त्यांनी त्यांचे सुरुवातीचे दिवस कंपालामध्ये घालवले आणि नंतर वयाच्या पाचव्या वर्षी दक्षिण आफ्रिकेत आले. ममदानी यांचे भारतीय वंशाचे वडील महमूद ममदानी केपटाऊन विद्यापीठात प्राध्यापक होते. त्यांनी त्यांचे सुरुवातीचे शिक्षण दक्षिण आफ्रिकेतील सर्वात जुनी शाळा सेंट जॉर्ज ग्रामर स्कूलमध्ये घेतले, जी १८४८ मध्ये केपटाऊनमध्ये सुरू झाली. ते वयाच्या सातव्या वर्षी न्यूयॉर्कला गेले. त्यांनी ब्रॉन्क्स हायस्कूल ऑफ सायन्समध्ये शिक्षण घेतले. २०१४ मध्ये त्यांनी बोडेन कॉलेजमधून आफ्रिकन स्टडीजमध्ये बॅचलर पदवी प्राप्त केली. काही वर्षांनंतर, २०१८ मध्ये, ममदानी अमेरिकन नागरिक बनले. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यावर त्यांनी टीका केली आहे.

कामादरम्यान, त्यांनी पाहिले, की ज्या कुटुंबांना ते मदत करत होते त्यांच्या समस्या केवळ आर्थिकच नाहीत, तर धोरणाशी संबंधितदेखील होत्या. या अनुभवाने त्यांना सक्रिय राजकारणाकडे प्रेरित केले. सामान्य लोकांवर परिणाम करणाऱ्या धोरणांमध्ये बदल करण्यासाठी ते राजकारणात आले. त्यांनी 'डेमोक्रॅटिक सोशलिस्ट पार्टी'च्या तिकिटावर २०२० मध्ये न्यू यॉर्क असेंब्लीच्या ३६ व्या जिल्ह्यातून (ॲस्टोरिया, क्वीन्स) निवडणूक लढवली. पहिल्याच प्रयत्नात ते विजयी झाले आणि न्यूयॉर्क राज्य असेंब्लीमध्ये पहिले दक्षिण आशियाई आणि पहिले समाजवादी प्रतिनिधी बनले. चार वेळा आमदार राहिलेल्या ज्येष्ठ नेत्याचा पराभव करून ते 'किंगमेकर' ठरले. आता डेमोक्रॅट ममदानी यांनी न्यूयॉर्क महापौर प्रायमरीमध्ये माजी गव्हर्नरला मागे टाकून सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. २०२१ मध्ये लैंगिक छळाच्या प्रकरणात राजीनामा दिल्यानंतर ६७ वर्षीय माजी गव्हर्नर कुओमो राजकीय पुनरागमनाचा प्रयत्न करत होते. विजयानंतर ममदानी म्हणाले, 'आज रात्री आपण इतिहास घडवला आहे. नेल्सन मंडेला म्हणाले होते , स्वप्न पूर्ण होईपर्यंत ते नेहमीच अशक्य वाटते. माझ्या मित्रांनो, आम्ही ते केले. डेमोक्रॅटिक उमेदवार म्हणून मी तुमच्या न्यू यॉर्क शहराचा महापौर होईन.' ममदानी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांच्यावर टीका केली आहे. मे २०२५ मध्ये एका कार्यक्रमात त्यांना प्रश्न विचारण्यात आला होता, की मोदी यांनी मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये रॅली घेतली आणि नंतर न्यू यॉर्कच्या महापौरांसोबत पत्रकार परिषद घेतली तर काय होईल? जर त्यांना परिषदेला संबोधित करायचे असेल, तर ते त्यात सहभागी होतील का? ममदानी यांनी 'नाही' असे उत्तर दिले आणि म्हणाले, 'माझे वडील आणि त्यांचे कुटुंब गुजरातचे आहेत. गुजरातमध्ये मुस्लिमांच्या सामूहिक कत्तलीत मोदी यांनी मदत केली, इतका हिंसाचार झाला, की आता असे दिसते, की गुजराती मुस्लिम अस्तित्वातच नाहीत. आपण मोदी यांच्याकडे नेतन्याहू यांच्याकडे पाहतो, त्याच पद्धतीने पाहिले पाहिजे. ते युद्ध गुन्हेगार आहेत.' या विधानानंतर, काही इंडो-अमेरिकन आणि न्यू यॉर्कमधील हिंदू, शीख समुदायांनी ते फुटीरतावादी आणि द्वेषपूर्ण म्हटले. या लोकांनी ममदानी यांच्याकडून माफी मागण्याची मागणीही केली; परंतु त्यांनी माफी मागितली नाही. ममदानी यांना त्यांच्या प्रचारादरम्यान अलेक्झांड्रिया ओकासिओ-कॉर्टेझ आणि सिनेटर बर्नी सँडर्स यांचा पाठिंबा मिळाला. न्यूयॉर्क शहराच्या महापौरांचा कार्यकाळ चार वर्षांचा असतो. एखादी व्यक्ती सलग दोन टर्मसाठी (म्हणजे जास्तीत जास्त ८ वर्षे) महापौर राहू शकते. प्रत्येक पक्ष (उदा. डेमोक्रॅटिक, रिपब्लिकन) प्रथम आपला उमेदवार ठरवतो. यासाठी, प्राथमिक निवडणूक घेतली जाते, जिथे पक्षाचे नोंदणीकृत सदस्य त्यांचे मतदान करतात. न्यू यॉर्कमध्ये आता रँक-चॉइस मतदान वापरले जाते. मतदार त्यांच्या पसंतीनुसार १ ते ५ पर्यंतच्या उमेदवारांना रँक करतात. जर एखाद्याला पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळाली तर तोच थेट जिंकतो; अन्यथा राउंड बाय राउंड मतमोजणी होते. त्यानंतर प्रायमरी जिंकणारे उमेदवार नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत आमनेसामने येतात. सर्व नोंदणीकृत मतदार मतदान करण्यास पात्र आहेत. सर्वाधिक मते मिळवणारा उमेदवार न्यू यॉर्क शहराचा महापौर बनतो. भारतीय वंशाचे जोहरन ममदानी हे न्यू यॉर्कला केवळ अमेरिकेतच नव्हे, तर जगातील सर्वात मोठे आणि श्रीमंत शहर बनवण्यासाठी एक मजबूत दावेदार बनले आहेत. जोहरन यांनी डेमोक्रॅटिक पक्षातील इतर उमेदवारांना पराभूत केले आहे. त्यांचे प्रबळ प्रतिस्पर्धी आणि माजी गव्हर्नर अँड्यू कुओमो यांनी ममदानी यांच्याकडून पराभव स्वीकारला आहे. जर ममदानी जिंकले, तर ते न्यू यॉर्क शहरातील पहिले मुस्लिम आणि भारतीय वंशाचे पहिले व्यक्ती असतील.

# मन आणि योग



आजच्या आधुनिक अशा धावपळीच्या आणि स्पर्धात्मक युगात माणसाने विज्ञानात, तंत्रज्ञानात, सुख-सुविधांमध्ये भरपूर प्रगती केली आहे. पण,या प्रगतीसोबतच माणसाचे मन अधिक अस्थिर, चिंताग्रस्त आणि अस्वस्थ झाले आहे. शरीर निरोगी असणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच किंवा त्याहून अधिक मन शांत आणि समतोल असणे गरजेचे आहे. कारण शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक ,सामाजिक आणि आर्थिक आरोग्य सुदृढ असणे म्हणजेच पूर्ण आरोग्य होय. अशा परिस्थितीत योग हीच एक अमूल्य अशी प्राचीन काळापासून भारताने जगाला दिलेली भेट आहे, जी शरीराला तर सुदृढ करतेच पण मनाला नियंत्रित करण्यासाठी सर्वोत्तम उपाय आहे.

**मन: प्रशमन उपाय: योग: इत्यभिधीयते**
**म्हणजेच मन शांत करण्याचे तंत्र**
**म्हणजे योग.**

**तसेच योगश्चित्त वृत्ती निरोध:**

चित्तवृत्तींचा निरोध म्हणजेच, सर्व प्रकारच्या मनोव्यापारांचा संयमन म्हणजे योग. इथे चित्त या शब्दाचा सर्वसाधारण अर्थ मन असा आहे. ''मन'' हा एक अत्यंत सूक्ष्म आणि गुंतागुंतीचा विषय आहे. मन म्हणजे आपल्या विचारांची, भावना, इच्छा आणि निर्णयक्षमता असलेली एक मानसिक प्रक्रिया. एखादी गोष्ट पटणे, न पटणे, भावनिक होणे, निर्णय घेणे, चिंता करणे या सगळ्या गोष्टी मनाशी संबंधित असतात. मन खूप चंचल असते. क्षणाक्षणाला विचार बदलणारे, भूतकाळात रेंगाळणारे आणि भविष्याची चिंता करणारे मन अनेकदा आपल्याला वर्तमानात जगू देत नाही.

अशा असंतुलित , अस्वस्थ, चंचल किंवा त्रस्त मनाचे थेट परिणाम आपल्या शरीरावर आणि वर्तनावर होतात.

* तणाव, नैराश्य, चिंता यासारखे मानसिक आजार वाढतात
* झोपेचा अभाव, भूक मंदावणे, चिडचिडेपणा जाणवतो
* निर्णय क्षमता कमी होते.
* मानवी संबंधांमध्ये तणाव निर्माण होतो

अशा वेळी जर मनावर नियंत्रण ठेवता आले, तर आपले जीवन अधिक समाधानी आणि संतुलित होऊ शकते. आणि हाच नियंत्रणाचा मार्ग म्हणजे योग. सर्वसाधारणपणे योग म्हणजे योगासने अशा पद्धतीने बघण्याचा प्रघात आहे. पण योग ही संकल्पनाच मुळात खूप सूक्ष्म आहे. योग म्हणजे मन, शरीर आणि आत्मा यांचा संपूर्ण समन्वय. 'योग' या शब्दाचा अर्थच 'जोडणे' असा होतो म्हणजेच मन आणि शरीर यांना एकत्र आणणे.

योगात विविध आसने (शारीरिक व्यायाम), प्राणायाम (श्वसनाचे नियंत्रण) आणि ध्यान (ध्यानधारणा) यांचा समावेश असतो. योगाची एकूण आठ अंगे ही मुख्यतः ऋषी पतंजलीने सांगितलेली आहेत. १)यम २)नियम ३)आसन ४)प्राणायाम ५)प्रत्याहार६) धारणा७) ध्यान ८)समाधी

**१) यम** – व्यावहारिक अथवा सामाजिक पातळीवर मनुष्याने त्याचे जीवन कसे जगावे हे यात सांगितले आहे.

**२) नियम** – वैयक्तिक पातळीवर कोणत्या गोष्टी नित्य केल्या जाव्यात याचे वर्णन यात आले आहे.

**३) आसन** – स्थिर आणि सुखाचा अनुभव देणारी शारीरिक स्थिती. शरीर निरोगी राहण्यासाठी शरीराच्या विशिष्ट अशा नियमबद्ध हालचाली करून शरीराची आणि स्नायूंची लवचिकता वाढवी व ताकद निर्माण व्हावी यासाठी विविध आसनांचा उल्लेख आलेला आहे.

**४) प्राणायाम** – आपल्या शरीरामध्ये अखंडपणे वाहणाऱ्या प्राणशक्तीचे संयमन म्हणजेच प्राणायाम, प्राणायाचे संयमन आपल्याला करता आले तर मनावर संयम प्राप्त करणे हे सहज साध्य होऊ शकते.

**५) प्रत्याहार** – सर्वसामान्य माणसांची इंद्रिये मनाला विषयांकडे खेचून येतात पण प्रत्याहारांमध्ये मन इंद्रियांना स्वतःकडे खेचते. म्हणजेच बाह्य जगातील इतर गोष्टींविषयी वाटणारा आपला ज्ञानेंद्रियांचे आकर्षण हे हळूहळू कमी होते आणि माणूस स्वतःमध्ये स्थित होण्याचा प्रयत्न करू लागतो.

**६)धारणा** – चंचल दिशाहीन मनाला नियंत्रणात आणून ते एखाद्या विशिष्ट विषयावर एकाग्र करणे म्हणजेच धारणा

**७) ध्यान** – ही धारणेची पुढची अवस्था आहे धारणेतली एकसंध अतूट अविरत अनुभूती म्हणजे ध्यान.

**८) समाधी** – स्वतःची जाणीव हरपून ज्या विषयावर मन एकाग्र केले आहे त्याच्याशी एकरूप होणारा साधक हा समाधी स्थितीला जातो.

असा हा अष्टांग योग, यामध्ये यम नियम यांचे पालन हे व्यक्तिमत्त्व विकासासाठी खूप उपयुक्त ठरते. म्हणूनच योग ही एक खूप व्यापक संकल्पना आहे ती आपण जाणून घेणं तितकाच आवश्यक आहे कारण त्याचे आपल्यावर होणारे परिणाम हे खूपच उपयुक्त आहेत

**योगाचे मनावर होणारे परिणाम**

१. ध्यानामुळे मनःशांती मिळते ध्यान हे योगातील अत्यंत प्रभावी अंग आहे. रोज काही वेळ शांत बसून श्वासावर लक्ष केंद्रित केल्यास मनाची चंचलता कमी होते. विचारांची गर्दी हळूहळू शांत होते आणि अंतर्मुख होण्याची ताकद वाढते. सजगता वाढते

२. प्राणायामामुळे मन स्थिर होते

प्राणायाम म्हणजे श्वासाचे योग्य नियंत्रण. अनुलोम-विलोम, कपालभाती, भ्रामरी या प्रकारांमुळे मनावर ताजेपणा, स्थैर्य आणि उत्साह निर्माण होतो, रक्ताभिसरण सुधारते, झोप चांगली लागते, आणि चिंता कमी होते, फुफुसांचे कार्य सुधारते.



**वैद्य तेजस्विनी जोशी**
B.A.M.S, P.G.P.P. M.A.(SANSKRIT)
M.A.(CLINIC PSYCHOLOGY)
M.A.(YOGASHASTRA)
CLINIC ADRESS -
Vedayu Ayurved chikitsalaya, Flat no 102 Sneh apt.behind Fulpari sweet mall,near Indian oil petrol pump, manikbaug, Sinhagad road,Pune.

३. शरीराच्या हालचालीमुळे मानसिक आरोग्य सुधारते

योगासने शरीराला लवचिक आणि सक्षम करतातच, पण त्याचबरोबर मनातला भार देखील हलका करतात. विशिष्ट आसने जसे की वज्रासन, बालासन, शवासन यांचा मनावर सकारात्मक परिणाम होतो. बसून करण्याचे आसने,झोपून करण्याचे आसने,उभे राहून करण्याची आसने,पोटावर झोपून करण्याची आसने अशा विविध प्रकारच्या आसनांमुळे शरीरातली लवचिकता वाढते व अभ्यंतर अवयवांचे कार्य सुधारण्यास सुद्धा मदत होते शरीरातील विविध ग्रंथींचे कार्य सुद्धा आसनांमुळे सुधारते

४. एकाग्रता वाढते

योग आणि ध्यानाचे नियमित सराव केल्यास विचारांची स्पष्टता वाढते. अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांपासून ते काम करणाऱ्या व्यावसायिकांपर्यंत प्रत्येकासाठी एकाग्रता हा एक अमूल्य गुण आहे, जो योगामुळे विकसित होतो. प्रत्येक कामातील सजगता वाढण्यास मदत होते.

मन आणि योग आधुनिक काळातील गरज

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाइल, सोशल मीडिया, कामाचा ताण आणि जीवनशैलीतील अनियमितता यामुळे माणसाचे मन सतत दबावाखाली असते. मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांमध्ये चिडचिड, अस्वस्थता, मानसिक थकवा दिसून येतो. योग हा केवळ शरीर तंदुरुस्त ठेवण्याचा मार्ग नसून, तो मन शांत ठेवण्याची कला आहे. त्यामुळे योग ही आता एक निवड नसून, नव्या युगातील मानसिक आरोग्याची गरज बनली आहे.म्हणूनच सध्याचा काळासाठी योग ही एक अशी साधना आहे, जी मनाला विचारांपासून मुक्त करते, वर्तमानात जगण्याची कला शिकवते आणि अंतर्मनाशी जोडते. आज मन अस्थिर आहे म्हणून जग अस्वस्थ वाटते. पण जर मन शांत झाले, तर जग अधिक सुंदर वाटेल.

# श्री भगवान जगन्नाथाचे आ. काळेंनी घेतले आशिर्वाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : संपूर्ण देशात धार्मिक सण, उत्सवाप्रमाणे काढण्यात येणारी श्री भगवान जगन्नाथ यात्रा मागील वर्षीप्रमाणे याहीवर्षी रविवार (दि.२९) रोजी कोपरगावमध्ये काढण्यात आली होती. या रथ यात्रेत आ. आशुतोष काळे यांनी सहभागी होवून सेवा करून श्री भगवान जगन्नाथाचे मनोभावे पूजन करून आशिर्वाद घेतले.



मागील कित्येक शतकापासून ओरिसा राज्यातील जगन्नाथ पुरी येथे भगवान श्री जगन्नाथाची भव्य दिव्य रथयात्रा काढण्यात येते. हा सोहळा साजरा करण्यासाठी देश विदेशातून जगन्नाथ पुरी येथे दरवर्षी लाखो भाविक येत असतात आणि भगवान जगन्नाथाचे दर्शन घेवून आशीर्वाद घेत असतात. परंतु प्रत्येक भक्ताला जगन्नाथ पुरी येथे जाने शक्य नसल्यामुळे इस्कॉनचे संस्थापक आचार्य एसी भक्तीवेदांत स्वामी श्रील प्रभुपाद यांनी भगवान जगन्नाथाची कृपा संपूर्ण विश्वावर व्हावी यासाठी रथयात्रा सुरू केली आहे.

> श्री भगवान जगन्नाथाचे मनोभावे पूजन करून आशिर्वाद घेतले. आपली कृपादृष्टी मतदारसंघातील जनतेवर कायम रहावी. मतदार संघाच्या विकासाचा रथ समर्थपणे ओढत असतांना आपले आशीर्वाद नेहमीच पाठीशी राहावे अशी भगवान श्री जगन्नाथाच्या चरणी प्रार्थना केली आहे.
>
> **– आशुतोष काळे, आमदार**

त्या पार्श्वभूमीवर कोपरगाव शहरात याहीवर्षी आंतरराष्ट्रीय कृष्णा भावनामृत संघ इस्कॉन कोपरगाव यांच्यावतीने श्रीमान सुंदर चैतन्य प्रभुजी व श्री लक्ष्मीनारायण दास यांच्या मार्गदर्शनाखाली भगवान जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात येवून हजारो भक्तांच्या उपस्थितीत श्री. भगवान जगन्नाथाची भव्य रथ यात्रा काढण्यात आली होती.

रविवार (दि.२९) रोजी भगवान श्री जगन्नाथाची महाआरती करून हरे-कृष्ण, हरे-कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे च्या गजरात हि रथ यात्रा तहसील कार्यालय, भाजी मार्केट मैदान, गुरुद्वारा रोड, विघ्नेश्वर चौक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर मैदान, छत्रपती संभाजी महाराज स्मारक ते साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे स्मारक या मार्गाने काढण्यात आली. भगवान जगन्नाथ, भगवान बलदेव आणि माता सुभद्रादेवी यांच्या मूर्ती विराजमान असलेल्या रथाला फुलांसह रंगीबेरंगी वस्त्रांनी केलेली सजावटीतून भाविकांना जगन्नाथ पुरीच्या मुख्य रथ यात्रेची प्रचीती येवून भाविक सुखावले होते. यावेळी आ. आशुतोष काळे यांनी देखील या रथ यात्रेत सहभागी होवून भगवान जगन्नाथाचा रथ ओढला.

# आरोग्यदायी जीवनासाठी योग्य आहार

आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे यासाठी योग्य आहार व पोषण महत्वाचे आहे.

'उदरभरण नोहे जाणिजे जे यज्ञकर्म'

या उक्ती प्रमाणे फक्त पोट भरणे म्हणजे आहार नव्हे तो एक यज्ञ आहे ज्यात काही 'समिधा' अर्पण कराव्या लागतात.

योग्य आहार अर्थातच संतुलित आहार कसा असावा याबद्दल आपण अगदी थोडक्यात पाहूयात-

* प्रथिने : शारिरीक वाढीसाठी आणि दुरुस्तीसाठी
* स्निग्ध पदार्थ : ऊर्जा आणि हार्मोन्ससाठी
* कार्बोदके : ऊर्जा मिळवण्यासाठी
* जिवनसत्वे आणि खनिजे : रोगप्रतिकारक शक्तीसाठी
* पाणी : शरिरातील सर्व क्रिया सुरळीत ठेवण्यासाठी.

संतुलित आहारात काय असावे

* फळे आणि भाज्यांचे सेवन भरपुर करावे कारण त्यात जीवनसत्वे आणि खनिजे असतात.



**डॉ. शलाका केदारे/उबाळे**
BHMS. [Certified Dietician & Nutrition Expert]

* धान्य, कडधान्ये, आणि डाळींचे सेवन करावे कारण त्यातून प्रथिने आणि फायबर मिळतात.
* दुध आणि दुग्धजन्य पदार्थांचे सेवन करावे कारण त्यातून कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी मिळते.

जे मांसाहार करतात त्यांनी अंडी, मांस, मासे यांचे सेवन निश्चितच करावे कारण त्यात भरपूर प्रथिने आणि खनिजे असतातः

* पाणी भरपूर प्यावे

घरचे बनवलेले तूप आहारात सामाविष्ट केल्यास त्यातून चांगले स्निग्ध पदार्थ मिळतात.

त्याचबरोबर आहारात सर्व प्रकारचे सुकामेवा आणि काही बीयांचा देखील समाावेश करावा.

ज्याप्रकारे काय खावे हे जितके महत्वाचे तितकेच काय खाऊ नये ते देखिल महत्वाचे आहे.

प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ, (जंक फुड) ज्यात चरबी, साखर, मीठ जास्त प्रमाणात असते तर पोषणतत्वे अगदीच कमी किंवा नगन्य असतात.

(फास्ट फूड) जे अन्न लवकर तयार पिझ्झा, सँडविच, फ्राइज इत्यादी प्रकारच्या पदार्थांचा समावेश होतो.

* कोल्ड्रिंक्स व साखरयुक्त पेये- यात काबर्बोनेटेड पेये (जसे की सोडा) फळांचे रस, इतर थंड पेये सामाविष्ट आहेत.

विशेष-

* आहारासोबत व्यायामही गरजेचा आहे
* आरोग्य संतुलित राहाण्यासाठी झोप देखील महत्वाची आहे
* कुठलाही आहार फॉलो करताना डॉक्टर किंवा डाएटिशियनचा सब्ला घेणे श्रेयस्कर.

# 'विखे पाटील'च्या मुलींची तंत्रशिक्षण परिक्षेत बाजी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी:** राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून लोणी येथील पदमश्री विखे पाटील पॉलिटेक्निकने दरवर्षीप्रमाणे उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम राखली असून क्लाऊड कॉम्प्युटींग अँण्ड बिग डेटा विभागातील श्रध्दा निर्मळ ९३.७४ टक्के गुण प्राप्त करून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावीला असून श्रीमती सिंधूताई विखे पाटील सुवर्ण पदकाची मानकरी ठरली आहे.

याच अभ्यासक्रमातील साक्षी शिंदे ९२.२९ टक्के गुणांनी द्वितीय आणि मेकॅट्रॉनिक्स विभागातील कु देवयानी आढाव हिने ९१.७० टक्के गुण मिळवून तृतिय क्रमांक मिळविला असल्याची माहिती प्राचार्य डॉ. विजयकुमार राठी यांनी दिली. विभागवार प्रथम तिन क्रमांकाचे मानकरी कॉम्प्युटर विभाग प्रथम साक्षी मरकड ९१.३१ टक्के, द्वितिय मनस्वी पोकळे ९०.९१ टक्के, तृतिय सलोनी घोडेचोर ९०.६३. केमिकल साई बोरसे ८९.११ टक्के, कृष्णा पाटणकर ८८.२८ टक्के, सुनिता दुर्षिंग ८८.०६ टक्के, सिव्हिल अथर्व सराफ ८७.२६ टक्के, तेजस्वी बडाख ८६.३७ टक्के, ओम दिघे ८५ टक्के, मेकॅनिकल आदित्य आहेर ९०.९२ टक्के, प्रफुल्ल निर्मळ ८६.०५ टक्के, सुरज भागवत ८२.१५ टक्के, ऑटोमोबाइल श्रेयस कुलकर्णी ७९.४० टक्के, अथर्व जगदाळे ७७.०१ टक्के, क्लाऊड कॉम्प्युटींग अँण्ड बिग डेटा श्रध्दा निर्मळ ९३.७४ टक्के प्रथम, साक्षी शिंदे ९२.२९ टक्के, समर्थ निंबाळकर ९०.२४ टक्के, मेकॅट्रॉनिक्स विभागात देवयानी आढाव हीने ९१.७० टक्के गुण प्रथम, प्रणव खिलारी ८९.५६ टक्के, कोमल लांडे ८७.७८ टक्के तसेच इंटेरीयर डिझाईन अँण्ड डेकोरेशन कोर्समध्ये संस्कृति मुंदडा ८३.३७ टक्के, प्रतिक सांगळे ७८.२५ टक्के, ज्योती ढोमसे ७६.५० टक्के गुण प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे.

### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, पद्मश्री विखे कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. विजय राठी, उपप्राचार्य प्रा. नामदेव गरड, सर्व विभाग प्रमुख प्रा. राजेंद्र बेलकर, प्रा. रामनाथ लावरे, प्रा. राजेंद्र निंबाळकर, प्रा. रवींद्र काकडे, प्रा. एकनाथ घोगरे, प्रा. विजयश्री वैद्य, प्रा. संदीप गोर्डे, प्रा. निकीता पानगव्हाणे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# भविष्यात निसर्गावर आधारित शेती करावी लागणार : डॉ. डख; शेतकऱ्यांना सल्ला

कृषी दिनानिमित्त सर्व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना एवढं सांगू शकतो भविष्यामध्ये निसर्गावर आधारित शेती करावी लागेल. निसर्ग म्हणतोय पाऊस जास्त तर पावसावर येणारे पिके निवडावे लागतील. निसर्ग म्हणतो थंडी जास्त थंडीवर येणारे पिक घ्यावे लागतील निसर्ग म्हणतो आता जास्त उन्हाळात उष्णता तर उष्णतेवर येणारे पिक घ्यावे लागतील पण निसर्गाच्या विरोधात जाऊन शेती करणं शक्य नाही नसता अवकाळी संकटाला सामोरे जावे लागेल.

यावर्षी पूर्वेकडून पाउस आल्यामुळे बिड लातुर धाराशिव सोलापुर अहिल्या-नगर सांगली सातारा येथे जास्त पाउस होतो .

भविष्यात उष्णतेचा पारा वाढत जाणार आहे त्यामुळे पाउस वाढेल पण नैसर्गिक आप्पतीना तोंड द्यावे लागेल.

उष्णता कमी करायची तर झाडे लावावे लागतील. झाडे लावा पृथ्वीचे तापमाण कमी करा.



भविष्यामध्ये २०३५ ला आणखी दहा वर्षाने शेतीला किमंत राहील २०३५ ज्यांच्याकडे जमिन तो श्रीमंत राहील कारण शेतीचे १० वर्षाने भाव गगणाला भिडतील म्हणून ज्यांचाकडे शेती आहे जपून ठेवा घेणे शक्य होणार नाही.

शेती करायची तर तुम्हाला एक शेतकरी व हवामान अभ्यासक नात्याने सांगतो शेतीवर जो खर्च तो कमी करा कापसामधील अंतर कमी करा बियाणे संख्या वाढवा. खत जास्त देउ नका उतार वाढतो.

शक्यतो सोयाबिन हरभरा घरचे बियाणे वापरा . स्वताचे बियाणे स्वत तयार करा. दोन पेरणीचे बियाणे जवळ ठेवा.

हवामान अभ्यासक या नात्याने सांगु इच्छीतो हवामानावर आधारीत शेती करा आपल्या भागामध्ये जे वातावरण ज्या पिकाला जमते ते पिक निवडा.

दुसऱ्याने केले म्हणून आपण करू जमत नसते . ज्या त्या भागामध्ये वातावरण वेगवेगळे असते . पिक आपल्या भागात काय येऊ शकते तेच करा

### २०२५ हवामान अंदाज

यावर्षी चागंला पाउस होणार आहे.

सर्व तळे धरणे यावर्षी भरतील .

जायकवाडी धरण १० जुलै पर्यंत ५०% पार करेल .

लवकर पेरणी झाल्यामुळे पिकांना चांगला उतार येइल

# सत्यशीला मोरेंचे जिल्हा रुग्णालयाबाहेर उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कोपरगाव शहरातील ग्रामीण रुग्णालयचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. गुट्टे यांचा नियमांची व अधिकाराची पायमल्ली करत सध्या ग्रामीण रुग्णालयामध्ये सुरू असलेल्या सावळा गोंधळ आपल्या स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करुन क्षय विभागात प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदावर कार्यरत असलेल्या महिला कर्मचारी सत्यशिला मोरे यांना नियमाप्रमाणे कोणतीही कारणे दाखवा नोटीस न देता परस्पर सोशल मिडीया (व्हाट्स अप)वर कार्यमुक्तीचा आदेश देऊन सदर महिलेवर अन्याय केलेला आहे. या अन्याया विरोधात दाद मिळावी म्हणूण सत्यशिला मोरे ह्या मुलांसह उपोषणास बसल्या आहेत.

सत्यशिला नानासाहेब मोरे या कोपरगाव शहरातील ग्रामीण रुग्णालयात क्षय विभागात प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणुन कार्यरत असतांना त्या हॉस्पीटल मधिल वैद्यकिय अधिक्षक डॉ. गुट्टे यांचे विनापरवाना गैरहजर असलेले कर्मचाऱ्यांशी असलेले आर्थिक हितसंबध व असभ्य वर्तणूक करणारे कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणे या गैरव्यवहारास अडथळा निर्माण केला म्हणुन ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. गुट्टे यांनी अहिल्यानगरचे जिल्हा क्षयरोग अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी जि. प. अहिल्यानगर यांना मिळालेल्या चुकीच्या माहितीमुळे सदर महिलेवर आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन सोशल मिडीया (व्हाट्स अप) वरती कार्यमुक्तीचा आदेश देउन अन्याय केलेला आहे.

# सरपंच पदांचे नव्याने आरक्षण सोडत काढणार

## ओबीसींचे आरक्षण वाढले; गावकीचे राजकारण पेटणार; अनेकांचे गुडघ्याला बाशिंग

**निलम खोसे पाटील | जनता आवाज**

**पारनेर :** राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाने २०३० पर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांचा राज्याचा कोटा निश्चित केला असून यामध्ये खुल्या प्रवर्ग १३ हजार ६७, इतर मागासवर्ग ६७२९, एस. सी. ३२७२ तर एस. टी. १८६६ जागांचे सरपंच पद आरक्षित राहणार आहेत. त्यापैकी महिलांसाठी १२४९६ राखीव ठेवण्यात येणार आहे. त्यानुसार लवकरच जिल्हा पातळीवरील तालुकानिहाय सरपंच पदांसाठी आरक्षण निश्चित करून ते जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना कळविण्यात येणार आहे. तालुका तहसीलदारांकडून त्या- त्या तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांसाठी लवकरच पुन्हा नव्याने आरक्षण काढण्यात येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागासवर्गांसाठी असलेले आरक्षण मान्य केल्याने राज्यातील ग्रामपंचायतींसाठीचे इतर मागासवर्गीयांकरिता सरपंच पदे वाढणार आहेत. राज्याच्या ग्राम विकास विभागाने मार्च २०२५ मध्ये एक अधिसूचना काढून शेकडा २६. ४ टक्क्यांनुसार इतर मागासवर्गीयांसाठी सरपंच पदे कमी जिल्ह्यांना दिले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इतर मागासवर्गांचे शेकडा २७ टक्के आरक्षण मान्य केले. ग्रामविकास विभागांनी दिलेले पूर्वीच्या सरपंच आरक्षण सोडत रद्द करण्यात आले आहे. आता राज्याच्या ग्रामविकास विभागाकडून इतर मागासवर्गांच्या सरपंच पदाच्या वाढीव कोठ्याचे पुन्हा नव्याने आरक्षण सोडत काढण्यात येणार असून त्यानुसार राज्यातील त्या त्या जिल्ह्याला सरपंच पदाचे पदाचा कोटा प्राप्त झाला आहे.या नव्या आरक्षण सोडती नुसार राज्यात खुल्या प्रवर्गातील गेलेली ओबीसींचे सर्व सरपंचपदे ही पुन्हा इतर मागास प्रवर्गात येणार आहेत. त्यामुळे संपूर्ण राज्यात पुन्हा नव्याने सरपंच पदाचे आरक्षण सोडत काढावे लागणार आहे. या सरपंच पदाच्या तालुकानिहाय कोट्याचे वितरण जिल्हाधिकारी कार्यालय कार्यालयाकडून लवकरच त्या- त्या संबंधित तहसील कार्यालयांना केले जाणार आहे. त्यामुळे सरपंच पदाचे आरक्षण सोडत तात्काळ काढण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सफल पदाचा कोटा प्राप्त झाल्यानंतर त्याची तालुका निहाय वितरण करण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यातील ग्रामपंचायतीसाठी कोणत्या आरक्षण प्रवर्गात कोणती पद येणार, यासाठी तालुकास्तरीय तहसीलदार आरक्षण सोडत प्रक्रिया राबवणार आहे.



### महिलांना मिळणार मोठी संधी

राज्य पातळीवर १२४९६ महिलांना थेट सरपंच पद-ाची संधी मिळणार असून महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने ग्रामपंचायत मधील आरक्षण हे महत्त्वाचे पाऊल आहे. ग्राम विकास विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग त्यामुळे वाढणार आहे, त्या दृष्टीने शास-नाने हा निर्णय घेतला आहे.

# शाहू महाराज हे सर्वांचेच प्रेरणास्थान

## सरपंच संजीवनी पाटील; खर्डा येथे छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य वंचित, दलित, मागासवर्गीय, आदिवासी व गोरगरीब जनतेसाठी समर्पित केले. मागासवर्गीयांना आरक्षण लागू करणारे ते पहिले राजा होते. शिक्षण, आरक्षण आणि समतेचा संदेश देणारे शाहू महाराज प्रेरणास्थान आहेत. स्त्री शिकली तर समाज उभा राहतो हा विचार रूजवून शिक्षणाचा हक्क दिला, असे गौरवोद्गार सरपंच संजीवनी पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.



जामखेड तालुक्यातील खर्डा येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी त्या बोलत होत्या. खर्डा येथील भुईकोट किल्ला ते बस स्थानकापर्यंत बैलगाडीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची प्रतिमा ठेवून ढोल ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा खर्डा गावच्या सरपंच संजीवनी पाटील तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून निवृत्त तहसीलदार जयसिंग भैसडे, तसेच स्वागत अध्यक्ष अ‍ॅड. डॉ. अरुण जाधव हे होते. या कार्यक्रमासाठी खर्डा पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बिपिनचंद्र लाड, सुनील साळुंखे, विशाल पवार, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष आतिश पारवे, रंजन मेघडंबर, दादासाहेब घायतडक, भिमराव सुरवसे, संतोष थोरात, किशोर दुशी, बाळासाहेब शिंदे, श्वेता गायकवाड, धनसिंह साळुंखे, धनराज पवार, गायक बाबासाहेब राजगुरू आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्रीरामपूर येथे श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुदायिक पारायण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** सालाबादप्रमाणे याही वर्षी साक्षात्कारी संत श्री गजानन महाराज मंदिर, संतनगरी, श्रीरामपूर येथे आषाढी एकादशीनिमित्त दि.५ ते ७ जुलै पर्यंत दररोज सकाळी १० वाजता श्री गजानन विजय या ग्रंथाचे सामुदायिक पारायण आयोजित केलेले आहे. या पारायणासाठी श्री गजानन विजय ग्रंथ मंदिरात उपलब्ध आहे. भाविकांनी या सामुदायिक पारायणासाठी बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन मंदिर व्यवस्थापनाकडून करण्यात आले आहे.

दि. १० जुलै रोजी श्री गुरुपौर्णिमा निमित्ताने नादब्रह्म या संगीतविषारद रेखाताई वाघ यांच्या भजनी मंडळाचा कार्यक्रम दुपारी ४ वाजता घेण्याचे आयोजित केलेले आहे. कार्यक्रमाच्या शेवटी प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी श्री. राजेंद्र पवार, वनिता जाधव, सुनिताबाई साबळे, लिलाबाई आढाव, श्री. गंधे, अनिता बोरकर या मंडळींनी भाविकांना निमंत्रित केलेले आहे.

# मुकुंदनगरमधील झाडांवरील तारा हटविल्या



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** मुकुंदनगरमधील झाडांवरील तारा महावितरण कर्मचाऱ्यांनी हटविल्याने समाधानाचे वातावरण आहे.

मुकुंदनगर फकीरवाडा परिसरात तमीमदारी मशीद शेजारील असलेल्या जुन्या झाडांमुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले होते. सदर झाडाच्या मोठ्या फांद्या विद्युत महावितरणाच्या मुख्य तारांवर गेलेल्या आहे व पावसाळ्यात वारा चालू झाला की तारा एकमेकांना चिकटतात व विद्युत पुरवठा बंद होते व चालू झाल्यानंतर ओल्या झाडांमध्ये करंट उतरतो व झाडातून घरांच्या कंपाउंड मध्ये करंट उतरण्याची शक्यता होती. तसेच या झाडांच्या फांद्यांमुळे तारा तुटून घरावर किंवा रस्त्यावर पडू शकतात. हा रस्ता वरदळीचा असून बहुतेक शाळकरीमुळे याच रस्त्यावरून येजा करतात व बरेच लोकं धार्मिकी स्थळातून याच रस्त्यावरून जा ये करतात त्यामुळे सदर परिसरामध्ये मुख्य विद्युत पुरवठा करणाऱ्या तारांवर असणाऱ्या झाडाच्या फांद्या कापण्याची मागणी करण्यात आली होती या मागणीची दखल घेत विद्युत महावितरण व महानगरपालिका यांच्या कर्मचाऱ्यांनी फांद्या कापून विद्युत पुरवठा करणारी तार मोकळी केलेली आहे त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या वतीने माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांचा नागरिक सत्कार करून आभार मानण्यात आले.

# गोळवाडी गाव दहा दिवसांपासून निर्जळी

## धरण उशाशी असूनही गाव मात्र उपाशी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील गोळवाडी/म ीरकनगर ग्रुप ग्रामपंचायत येथे गेल्या सात ते आठ दिवसापासून टाकीला पाणी नाही. त्यामुळे ग्रामस्थांची पाण्यासाठी दाहिदिशा फिरण्याची वेळ आली आहे. गावाच्या टाकीला पाणी येत नाही म्हणून कोणीच लक्ष देत नाही. गावामध्ये सरकारी हातपंप होते त्या हातपंपावरतीही ग्रामस्थांनी अतिक्रमण केले आहे.

गोळवाडी ग्रामपंचायत सरपंच (भाऊसाहेब पाटील शिंदे) यांना टाकीला पाणी का नाही येत. असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की, पाण्याची समस्या फक्त तुला एकट्यालाच आहे का? असे त्यांनी उद्धटपणे सांगितले. जो कोणी ग्रामस्थ त्यांना विचारे ते असेच सांगतात. ग्रामपंचायत सदस्य ही लक्ष देत नाही. त्यामुळे गावामध्ये पाण्याची टंचाई होत आहे. गोळवाडी गावाशेजारी बोर(दहेगाव) धरण आहे. तेथून गोळवाडी गावा पाईपलाईन द्वारे पाणी येते. गावाच्या टाकीला चार-पाच दिवस पाणी येते. नंतर लगेच सात ते आठ दिवस तारखेला पाणी येत नाही. त्यामुळे ग्रामस्थ यांनी सरपंचांना विचारले असता ते सांगतात की पाईपलाईन तुटलेली आहे, ती जोडण्यात येत आहे. परंतु ग्रामस्थांना असा प्रश्न पडतो की पाईपलाईन अशी महिन्यामध्ये किती वेळेस फुटते. असा प्रश्न आता ग्रामस्थांना पडला आहे.

# सुवर्णा काले यांची निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर :** श्री भारतवर्षीय दिगंबर जैन महिला महासभा महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षा म्हणून सुवर्णा सुमेरकुमार काले यांची निवड झाली आहे. श्री भारतवर्षीय दिगंबर जैन महिला महासभा महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षा म्हणून सुवर्णा महेंद्रकुमार काले यांना नियुक्ती पत्र राष्ट्रीय अध्यक्ष सरिता महेंद्र कुमार जैन व राष्ट्रीय कार्यवाहक अध्यक्ष रंजना जैन बाकलीवाल, राष्ट्रीय कार्याध्यक्ष संध्या जैन सेठी, राष्ट्रीय महामंत्री ज्योत्सना जैन यांनी दिले आहे.

सुवर्णा सुमेरकुमार काले या माजी राज्य वस्तू व सेवा कराचे अतिरिक्त आयुक्त व सिद्ध क्षेत्र मांगीतुंगीचे अध्यक्ष सुमेरकुमार काले यांच्या त्या पत्नी आहे. तर यश काले वनअधिकारी यांच्या मातोश्री आहे तर नाशिक जिल्हा परिषदचे माजी सदस्य उद्योजक महिंद्र काले यांच्यात भोवजीय आहेत तर शिर्डी येथील जेष्ठ पत्रकार बि. के. पाटणी यांच्या भाची तर कोपरंगाव चे मेडिकल व्यवसाय जितेंद्र गंगवाल यांच्या भगिनी आहेत तर श्रीरामपूरचे दिगंबर जैन समाजाचे माजी अध्यक्ष अनिल पांडे यांच्या आत्याबहिण आहे.

# वारकऱ्यांची केली वैद्यकीय तपासणी

## पारनेर तालुक्यातील डॉक्टरांचा उपक्रम



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पारनेर तालुक्यातील सर्व डॉक्टरांनी पंढरपूरच्या विठ्ठल व रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी निघालेल्या दिंडी सोहळ्यातील वारकऱ्यांची अत्यंत आपुलकी व निःस्वार्थ भावनेतून मोफत तपासणी करून आवश्यक औषधे वाटप केली.

या सेवेतून त्यांनी फक्त शारीरिक आरोग्याचीच नव्हे तर मानसिक बळाचीही खात्री दिली. वारकऱ्यांच्या पावलांम ध्ये थकवा न येऊ देता ते निर्धास्तपणे पंढरीच्या वाटेवर चालू शकतील, यासाठी डॉक्टरांनी आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा अमूल्य उपयोग केला.

या सेवाभावी कार्याबद्दल तालुक्यातील डॉ. बाळासाहेब घोगरे, डॉ. सरोदे, डॉ. डी. पी. श्रीमंदीलकर, डॉ. राजेश थोरात, डॉ. सुनिल कदम, डॉ. लाळगे, डॉ. भास्कर शिरोळे, डॉ. स्मिता शिरोळे, डॉ. श्रीकांत पठारे, डॉ. विशाल सुपेकर, डॉ. अजित लंके, डॉ. पांडुरंग थोरात, डॉ. कांडेकर, डॉ. आढाव, डॉ. जाधव, डॉ. उत्तम थोरात, डॉ. झावरे, डॉ. खामकर, डॉ . मावळे व इतर डॉक्टरांनी आपापली वैद्यकिय साहित्य, औषधे, इंजिक्शन व इतर प्रथमोपचार साहित्य घेऊन इंदापूर येथे जगतगुरू संत तुकाराम महाराज व शेवटचे संत निळोबा महाराज या गुरु शिष्यांच्या भेटी दरम्यान असणाऱ्या पहिला अश्व रिंगण सोहळ्याच्या दरम्यान पायी चालत आलेले पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातील वारकऱ्यांची तपासणी करून त्यांच्या आजारांनुसार त्यांच्यावर औषधोपचार केले.


जा.क्र १८९५/२०२५
कार्यालयाचा पत्ता-सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहमदनगर विभाग, अहमदनगर नवीन प्रशासकीय इमारत,
आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडी, अहमदनगर- ४१४००३.
दि.२५/६/२०२५

## चौकशीची जाहीर नोटीस

स्कीम चौकशी अर्ज क्रमांक -३८/२०२३
ट्रस्टचे नाव :-खंडोबा मंदिर ट्रस्ट,
पत्ता :-महालक्ष्मी हिवरे, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
नोंदणी क्र :A१५६६/२०२२ / अहमदनगर

**अर्जदार-**१. श्री. अशोक सिताराम केदार, २. श्री. पप्पू संजय गायके, दोघे रा. महालक्ष्मी हिवरे, ता. नेवासा, जि.अ.नगर सामनेवाले कोणी नाही.

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त साहेब अहिल्यानगर विभाग हे वर नमुद केलेल्या स्कीम चौकशी अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० अ १ चे अर्जान्वये खालील मुदयांवर चौकशी करणार आहेत.

१. उपरोक्त अर्जदारांनी नमूद न्यासास पूर्वी कोणतीही स्कीम (नियम व नियमावली) अस्तित्वात नसल्याने सदरहू न्यासाचे कार्य प्रभावीपणे व जोमाने करण्यासाठी उपरोक्त स्कीम अर्ज अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

२. न्यासाचे विश्वस्तांची संख्या: या न्यासाच्या विश्वस्तांची संख्या कमीत कमी ०७ व जास्तीत जास्त २५ अशी राहील. सदरहू विश्वस्तांची संख्या वाढविनेची व कमी करण्याचा अधिकार विश्वस्तांना राहील. तसेच घटनेमध्ये दुरुस्त करण्याचा अधिकार देखील विश्वस्तांना राहील.

३. विश्वस्त मंडळाची मुदत व निवड: न्यास संस्थेच्या (भक्त मंडळाच्या) वार्षिक सर्वसाधारण सभे मधून कमीत कमी ०७ व जास्तीत जास्त २५ विश्वस्त निवड हि भक्त मंडळा मधून बहुमताने निवडणूक पद्धतीने केली जाईल. सदरच्या विश्वस्त चा कार्यकाळ ५ वर्षाचा राहील, परंतु एखादा विश्वस्त मुदती पूर्वी मयत / मृत्यू झाल्यास, राजीनामा दिल्यास किंवा अन्य कारणाने पद रिक्त झाल्यास उरलेल्या कालावधी साठी सर्व सभासदांमधून (भक्तमंडळा) मधून रिक्त जागी नवीन विश्वस्तांची निवड बहुमताने करण्यात येईल. नवीन विश्वस्तांची नियुक्ती त्यावेळच्या विश्वस्तांच्या कालावधीपुरती मर्यादित राहील.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त, अहिल्यानगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक -२०/०६/२५ रोजी दिली.

शिक्का

वरिष्ठ लिपिक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर

(अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर


# पाथर्डीत खाडेंची सिंघम स्टाईलने कारवाई



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** सिंघम पिक्चर मधला सिन सोमवारी पाथर्डी शहरात अक्षरशः वास्तवात उतरलेला दिसला, तोही एका पोलीस अधिकाऱ्याच्या प्रत्यक्ष कारवाईमुळे! परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांनी आपल्या विशेष पथकासह शहरातील बेशिस्त वाहतूक, अवैध व्यवसाय, आणि कायदा तोडणाऱ्यांवर थेट रस्त्यावर उतरून धडाकेबाज कारवाई केली.

नाईक चौक, कोरडगाव चौक, जुना बस स्टँड परिसर आणि शेवगाव रोड या शहरातील प्रमुख ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. काळ्या काचा लावलेल्या गाड्यांना थांबवत त्या तात्काळ काढायला लावल्या आणि दंड आकारण्यात आला. नंबर प्लेटशिवाय फिरणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई केली गेली. बुलेट बाईक्सवरील कर्कश आवाजाचे सायलेन्सरही त्वरित काढून घेण्यात आले.फक्त वाहतूक नव्हे, तर लॉजिंगच्या नावाखाली सुरू असलेल्या काही संशयित अवैध धंद्यांवरही खाडे पथकाने झडती घेतली. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना 'ऑन द स्पॉट' शिक्षा करण्यात आली. ही संपूर्ण कारवाई एखाद्या ॲक्शन चित्रपटात शोभेल अशी होती, पण तिचा परिणाम मात्र शहराच्या सुरक्षेवर सकारात्मक ठरला.

> ही कारवाई म्हणजे गुन्हेगारी प्रवृत्तीवर लगाम आणि सामान्य नागरिकांसाठी दिलासा आहे. खुद्द आमदार मोनिका राजळे यांनी देखील सार्वजनिक व्यासपीठावरून संतोष खाडे यांच्या धाडसाचे अभिनंदन केले. कायद्याला हरताळ फासणाऱ्यांसाठी खाडेंचा करारा दणका आणि शहरवासी यांसाठी दिलासा देणारी ठरली.

शहरात कायदा-सुव्यवस्थेचा ठाम संदेश गेला असून, अनेक वाहनचालकांनी स्वतःहून नियम पाळायला सुरुवात केली आहे. रस्त्यावर विक्री करणारे फेरीवालेही अधिक शिस्तीत व्यवहार करत आहेत. म ाजी नगरसेविका मंगल कोकाटे यांनी खाडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत सांगितले, शाळा-कॉलेजला जाणाऱ्या मुली सुरक्षिततेबाबत आता निश्चिंत आहेत.

# गंगागिरी महाराज दिंडीचे कर्जतमध्ये रिंगण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत येथे सरला बेट गंगागिरी महाराज पायी दिंडीचा पहिले गोल रिंगण मोठ्या भक्तिभाव आणि शिस्तबद्धतेने कर्जत येथे पार पडले. महंत रामगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सरला बेट येथून पंढरपूरकडे जाणाऱ्या या दिंडीची ख्याती शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि हरिनामाच्या भक्तिपूर्वक माहोलासाठी राज्यामध्ये प्रसिद्ध आहे.कर्जत तालुक्यातील बहिरोबावाडी येथे या दिंडीचे भरभरून स्वागत करण्यात आले. उद्योजक दीपक शिंदे, हॉटेल भैरव ग्रँड, तसेच राहुल शेठ शिंदे यांच्या पुढाकारातून दिंडीतील सर्व वारकऱ्यांसाठी दुपारच्या भोजनाची भव्य व्यवस्था करण्यात आली होती. सायंकाळच्या सुमारास दादा पाटील महाविद्यालयाच्या समोरील मैदानावर दिंडीचे गोल रिंगण अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. टाळ-मृदंगाचा गजर, अभंग व हरिपाठाच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने न्हालून निघाला. कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती आबासाहेब पाटील यांनी ग्रामस्थांच्या वतीने दिंडीचे स्वागत केले. श्री श्री रविशंकर मंडळ आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी स्वागताचे नियोजन अत्यंत नेटकेपणाने पार पाडले. दंडी सोहळ्यादरम्यान महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते या दिंडीची यशवंत शिक्षण संस्थेच्या श्री अमरनाथ विद्यालय या ठिकाणी निवासाची व्यवस्था केल्याबद्दल व संत सद्गुरू गोदड महाराज अन्नछत्राचे प्रमुख सेवेकरी असलेले कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अभय पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# आ. जगतापांमुळे ड्रेनेज लाईनचा प्रश्न सुटला



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** केडगावच्या लोंढे मळ्यात प्रलंबित असलेल्या ड्रेनेज लाईनचे प्रश्न अखेर मार्गी लागले असून, हे काम आ. संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून व युवा नेते सुमित लोंढे यांच्या पाठपुराव्याने झाले आहे. सदर काम मार्गी लावल्याबद्दल सुमित लोंढे यांचा ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभात दत्तात्रय जाधव, विकास विधाते, दादा नेमाने, सागर लोंढे, सोमनाथ दळवी, दत्तात्रय विधाते, बाळकृष्ण लोंढे, सुभद्रा दळवी, रेणुका लोंढे, दत्ता गिरमे, कोमल लोंढे, सारिका शिंदे, संतोष शिंदे आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या परिसरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत असून पायाभूत सुविधांचा अभाव होता. विशेषतः ड्रेनेज व्यवस्था नसल्यामुळे पावसाळ्यात घरासमोर साचणारे पाणी, दुर्गंधी, डास व आजारांचे प्रमाण वाढले होते. हे काम मार्गी लागल्यामुळे आरोग्याच्या समस्या दूर होतील, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी सत्कारप्रसंगी व्यक्त केली.

> पावसाळ्यामध्ये लोंढे मळा परिसरात ड्रेनेज लाईन नसल्याने मोठी दुर्गंधी पसरत होता. पाणी साचल्यामुळे डासांची उत्पत्ती होऊन साथीचे आजार पसरत होते. मात्र ही समस्या सुमित लोंढे यांनी सोडविल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न सुटला आहे.
>
> **– सोनाजी शिंदे महाराज**

सुमित लोंढे म्हणाले की, लोंढे मळ्यातील गजानन नगर, गणेश मंदिर परिसरातील नागरिक अनेक वर्षांपासून ड्रेनेज लाईनच्या कामाची मागणी करत होते.

हा प्रश्न आ. जगताप यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांच्या निधीतून हे काम मंजूर करण्यात आले. या कामामुळे परिसरातील स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य व पर्यावरण सुधारण्यात मोलाची भर पडेल. पुढील काळातही लोंढे मळ्यासह परिसरातील विविध नागरी समस्या सोडवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# दुष्काळी भागासाठीच निळवंडेसह कालवे पूर्ण

## माजीमंत्री बाळासाहेब थोरात; चिंचोली गुरव येथे सोसायटी इमारतीचे उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**तळेगाव दिघे :** चिंचोली गुरव येथे झालेल्या पाणी परिषदेमुळे निळवंडे येथे धरणाची जागा निश्चित झाली. धरण व कालव्यासाठी आपण सातत्याने काम केले. निळवंडेमुळे उंचीवरील भागातून कालवे घेता आल्याने दुष्काळी भागामध्ये पाणी आले आहे. कालव्यांच्या वरच्या बाजूचे शेतकरी जे बाकी आहे. त्यांनाही पाणी देण्यासाठी आपला सातत्याने पाठपुरावा असून दुष्काळी भागासाठीच निळवंडे व कालवे पूर्ण केले आहे. सततची विकास कामे आलेले पाणी यामुळे या भागात समृद्धी निर्माण होणार असल्याचे प्रतिपादन माजी महसूल व कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.



चिंचोली गुरव येथे पूर्व भाग सेवा सहकारी सोसायटीच्या नवीन इमारत उद्घाटन प्रसंगी व देवराईच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर सिने अभिनेते सयाजी शिंदे, खा. भाऊसाहेब वाकचौरे, दुर्गाताई तांबे, गणपतराव सांगळे, महेंद्र गोडगे, संपतराव गोडगे, हौशीराम सोनवणे, नवनाथ आरगडे, भारत शेठ मुंगसे, सुभाष सांगळे, सचिन दिघे, सरपंच विलास अण्णा सोनवणे, विलास सोनवणे, अंकुश ताजने, योगेश भालेराव, अनिल कांदळकर, रामनाथ कुटे, पप्पू गोडगे, विजय गोडगे, अशोकराव गोडगे, विठ्ठल मेढे, योगेश सोनवणे, राजेंद्र कहांडळ, वाल्मीक गोडगे आदी उपस्थित होते.

यावेळी देवराई फाउंडेशन व चिंचोली गुरव ग्रामस्थ यांच्यावतीने चिंचोली गुरवमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, चिंचोली गुरव येथे पाणी परिषद झाली आणि निळवंडे धरणाची जागा निश्चित करण्यात आली. त्यामुळे उंचीवरून कालवे येऊन या परिसरामध्ये पाणी आले. कारखान्याच्या यंत्रणेच्या मदतीने पाणी आल्याने समृद्धी आहे. या परिसरा करता आपण सतत विकास कामे केली आहे.

> गावाच्या कामांसाठी निधी दिला आहे, विविध रस्ते पूर्ण झाले आहेत. साखळी बंधारे निर्माण झाले आहे. जे शेतकरी निळवंडे च्या पाण्यापासून वंचित आहे. त्यांना पाणी देण्यासाठी आराखडा पूर्ण करण्यात आला आहे. हे पाणी देण्यासाठी आपलाच पाठपुरावा राहणार आहे. शेतकऱ्यांचे कष्ट आणि विकास कामे यातून समृद्धी दिसत आहे.
>
> **– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

> आजचे राजकारण अस्थिर आहे. अनेक जण सत्तेसाठी पक्ष बदलतात मात्र विचारांवर निष्ठा असलेले वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात हे एकनिष्ठ असून सातत्याने जनतेसाठी काम करणारे लोक नेतृत्व आहे. राजकारणातील आदर्श व्यक्तिमत्व असा त्यांचा गौरव होत असून ते समाजकारणातील खरे हिरो असल्याचे प्रतिपादन सयाजी शिंदे यांनी करताच उपस्थित जनसमुदायाने टाळ्यांचा कडकडाट केला.
>
> **– सयाजी शिंदे, सिने अभिनेते**

# सतीश कुलकर्णी यांना समाज माध्यम पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्य सरकारतर्फे देण्यात येणारा राज्यस्तरीय समाज माध्यम पत्रकारिता पुरस्कार येथील ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक सतीश स. कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे.



कुलकर्णी यांनी राज्य पातळीवरील विविध दैनिकांध्ये नगर, पुणे व संभाजीनगर येथे उपसंपादक ते वृत्तसंपादक पदांवर काम केले. सध्या ते मुक्त पत्रकारिता व नियमितपणे ब्लॉगलेखन करत आहेत.

# मधुकर तळपाडेंचा शिंदे शिवसेना गटात प्रवेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** तीन वेळा विधानसभेची निवडणूक लढवून आमदारकीचे स्वप्न पूर्ण न झालेल्या मधुकर तळपाडे यांनी अखेर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे.

निवडणूक लढविलेले मधुकर तळपाडे यांनी काल रविवारी दुपारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची साथ सोडत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेते प्रवेश केला.



आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिर्डी संस्थानचे माजी विश्वस्त डॉ. जालिंदर भोर यांनी तालुक्यातील शिवसेनेच्या पक्षबांधणीत विशेष लक्ष घातले आहे. त्यांच्या पुढाकारातून काही दिवसांपूर्वी माजी उपसभापती मारुती मेंगाळ, जगन देशमुख, रामदास आंबरे, बाळासाहेब भोर, रोहिदास भोर, सुशांत गजे, सचिन शेटे, गणेश पापळ, प्रकाश पाचपुते, जावेद जहागिरदार, सुभाष येवले आदिंनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यापाठोपाठ मधुकर तळपाडे यांनीही शिंदे सेनेत प्रवेश केला.

मधुकर तळपाडे पक्ष प्रवेश आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेला बळकटी आणणारा असा आहे. यामुळे अकोले तालुक्यात शिवसेना शिंदे पक्षाची ताकद वाढली आहे. पक्ष प्रवेशावेळी राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे, डॉ. अमोल भोर, उपजिल्हाप्रमुख मारुती मेंगाळ, तालुकाप्रमुख सुशांत गजे, युवासेना जिल्हाप्रमुख महेश देशमुख, तालुका कार्याध्यक्ष जगन देशमुख, तालुका सहसचिव सुभाष येवले, महिला आघाडीच्या शर्मिला येवले, अकोले शहर कार्याध्यक्ष जावेद जहागिरदार, शहर सचिव सचिन भालेराव, गटप्रमुख प्रकाश पाचपुते आदी उपस्थित होते.

# लाखोंच्या बनावट नोटा पकडल्या

## राहुरी पोलिसांकडून मुद्देमाल जप्त; तीन आरोपी गजाआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** राहुरी पोलिस पथकाने काल मध्यरात्री शहर हद्दीत धडाकेबाज कारवाई केली. दोन लाख रुपयांच्या २०० व ५०० रुपयांच्या बनावट नोटा घेऊन आलेल्या तीन आरोपींना पोलिस पथकाने सापळा लावून त्यांच्या मुसक्या आवळल्या. त्यानंतर त्यांच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अहिल्यानगर येथून तीन इसम बनावट नोटा घेऊन मोटरसायकलवर राहुरीकडे येत आहेत. अशी गुप्त खबर राहुरीचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना काल दि. २८ जून रोजी रात्री ११ वाजे दरम्यान मिळाली. तेव्हा पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी ताबडतोब एक पोलिस पथक बरोबर घेऊन राहुरी शहरातील नगर-मनमाड रस्त्यावर गाडगे महाराज आश्रम शाळा परिसरात सापळा लावला.



काही वेळाने तेथे एमएच ४५ वाय ४८३३ क्रमांकाच्या मोटरसायकलवर तिन इसम आले. तेव्हा पोलिस पथकाने त्यांना जागेवरच झडप घालून पकडले. पथकाने त्यांची अंग झडती घेतली असता त्यांच्या जवळ २ लाख रुपयांच्या २०० व ५०० रुपयांच्या बनावट नोटा आढळून आल्या. क्सीस बँक राहुरी शाखेचे मॅनेजर कैलास वाणी यांनी घटनास्थळी सदर नोटा बनावट असल्याची खात्री केली. त्यानंतर पथकाने मुद्देमाल जप्त करून आरोपींना गजाआड केले.

हवालदार सुरज गायकवाड यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात आरोपी पप्पु ऊर्फ प्रतीक भारत पवार (वय ३३, रा. अर्जुन नगर, ता. करमाळा, जि. सोलापुर), राजेंद्र कोंडीबा चौघुले (वय ४२), तात्या विश्वनाथ हजारे (वय ४०, दोघे रा. पाटेगांव, ता. कर्जत जि. अहिल्यानगर) या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर आरोपी २०० व ५०० च्या बनावट नोटा राहुरी शहरात कोणाला देण्यासाठी आले होते. त्यांनी नोटा कोठून आणल्यात, यामध्ये आणखी कोण कोण सामील आहेत. या बाबतचा पुढील तपास पोलिस उप निरीक्षक संदिप मुरकुटे हे करीत आहे.

सदरची कारवाई पोलिस निरीक्षक संजय ठेंगे, पोलिस उप निरीक्षक संदिप मुरकुटे, राजू जाधव, हवालदार सुरज गायकवाड, राहुल यादव, प्रमोद ढोकणे, नदिम शेख, सतिष कुऱ्हाडे, अंकुश भोसले, चालक शकुर सय्यद आदि पोलिस पथकाने केली.

# भ्रष्ट ठेकेदारांची चौकशी करून कारवाई करा

## आ. अमोल खताळ यांचे मुख्याधिकाऱ्यांना निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर नगरपालिकेत अनेक वर्षांपासून कचरा व्यवस्थापन, गटारी स्वच्छता आणि रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम करणाऱ्या ठेकेदारांची चौकशी करून दोषी ठेकेदारांविरुद्ध कारवाई करा असे फक्त आदेश आमदार अमोल खताळ यांनी मुख्याधिकारी रामदास कोकरे यांना दिले.

संगमनेर शहरातील दिल्ली नाका येथे नागरी दलीतेत्तर वस्ती सुधार योजनेच्या अंतर्गत संगमनेर शहरातील दिल्ली नाका परिसरात भूमिगत गटार काँक्रिटीकरण सुधारणा तसेच सर्व्हिस रोड तयार करणे कामाचे भूमिपूजन आ. खताळ यांच्या हस्ते रविवारी सकाळी करण्यात आले. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर भाजपचे ज्येष्ठ नेते जावेद जहागीरदार, ड. श्रीराम गणपुले, ज्ञानेश्वर कर्पे, शिरीष मुळे, दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, रामभाऊ राहणे, कैलास कासार, दादाभाऊ गुंजाळ, रोहित चौधरी, वरद बागुल, ऋषिकेश मुळे, सौरभ देशमुख, राहुल भोईर, गोकुळ दिघे उपस्थित होते.



> संगमनेर शहरात एसटीपी प्लांट उभा करण्याचा काहींनी घाट घातला आहे. मात्र तो प्लांट इतरत्र हलविण्यासाठी मी तुमच्याबरोबर राहील. केंद्रात आणि राज्यात महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे निधी आणण्यासाठी आणि विकासाचा वेग साधण्यासाठी आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीत विकासाभिमुख उमेदवार निवडून द्या.
>
> **–अमोल खताळ, आमदार**

आ. खताळ म्हणाले की, गेल्या ३० वर्षांपासून नगरपालिकेवर तुमची सत्ता होती. तेव्हा गटारीचे आणि रस्त्याच्या कामाचे ठेके तुमच्या ठेकेदाराला दिले. मोर्चा काढायला सुद्धा तेच ठेकेदार पुढे होते. संगमनेर नगरपालिकेत त्यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याने या बाबतची माहिती माझ्या कार्यालयात द्या. त्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी लवकरच उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर बैठक घेऊन भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई करण्यास भाग पाडू,असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दिल्ली नाका परिसरात होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी सर्विस रस्ता होणे गरजेचे आहे असा आग्रह पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे धरला होता त्यांनी तात्काळ नागरी दलीतेत्तर वस्ती सुधार योजनेतुन १ कोटी ५१ लाख ६९ हजार रुपये मंजूर केले या निधीतून कामाची सुरुवात करण्यात आली आहे.

# नागरिकांनो, प्रशासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्या : पाटील



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा :** महाराष्ट्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजना महसूल विभागाकडून राबवल्या जात असून गरजूवतांनी अन्न सुरक्षा, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, संजय गांधी निराधार, आवास योजना या कल्याणकारी योजणांचा लाभ घ्यावा, असे आवाहन अहिल्यानगर विभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले.

कुकाणा येथे आयोजित मंडळ महसूल विभागाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी तहसीलदार डॉ. संजय बिरादार, अंकुशराव काळे, सरपंच दिनकराव गर्जे, सरपंच लताताई अभंग, दौलतराव देशमुख, भाऊसाहेब फोलाणे सरपंच भाऊसाहेब सावंत, सतीशराव कर्डीले, संदीप देशमुख, मच्छिंद्र कावरे, मच्छिंद्र आर्ले हकीमाबी शेख, शिंदे,मच्छिंद्र प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

गायरान जमिनीतील अतिक्रमन नियमित होतात. परंतु त्यातील अटीमुळे ती प्रकरणे प्रलंबित राहात असून पोट खराबा नोंद असलेली परंतु, शेती लागवड योग्य सर्व प्रकरणे महसूल विभागाकडून दुरुस्त करण्याचे काम गतीने चालु असून सर्व अशा खातेदारानी प्रतिसाद देण्याची गरज आहे, असे पाटील यांनी सांगितले. भाऊसाहेब सावंत, अंकुराव काळे, तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांनी मार्गर्शन केले.

कार्यक्रमासाठी कुकाणा मंडळ अधिकारी तृप्ती साळवे, ग्राम महसूल अधिकारी अभिजित क्षीरसागर, प्रियंका चव्हाण, विजय काळे, बद्रीनाथ कामानदार, संजय भालेकर, राजेंद्र काळे, जॉय ओहळ, सुभाष महाशिकारे, सागर गायकवाड तसेच सेतू चालक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अपघातातील मृतांच्या वारसांसह जखमींना भरपाई

## नेवासा न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय; ६ कोटी १५ लाख देण्याचा आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील कांगोणी- खरवंडी शिवारात ९ जून २०२२ रोजी झालेल्या दोन चारचाकींच्या अपघातात मृत्यू झालेल्या दोन व्यक्तींच्या वारसांना व गंभीर जखमी झालेल्या महिलेस ६ कोटी १५ लाख रुपयांची नुकसान भरपाई ७ टक्के वार्षिक व्याजासह देण्याचा आदेश नेवासा येथील मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाचे सदस्य तथा जिल्हा न्यायाधीश हरिभाऊ वाघमारे यांनी दिला आहे.

हा निर्णय नेवासा न्यायालयाच्या इतिहासातील उच्च नुकसान भरपाईच्या निर्णयांपैकी एक मानला जात आहे.

# नागवडे कारखान्यामुळे श्रीगोंदा तालुक्याचा कायापालट

## चेअरमन राजेंद्र नागवडे; नागवडे कारखान्याच्या ५१ व्या गळीत हंगामाच्या मिल रोलचे पूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्यामुळे श्रीगोंदा तालुक्याचा कायापालट झाला असून तालुका वैभवाच्या शिखरावर उभा राहिलेला आहे. या सहकार गंगोत्रीचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी सर्वांची असल्यामुळे त्याकरिता सभासद व ऊस उत्पादक शेतकरी व कामगार यांनी सहकार्य करावे असे आवाहन नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी केले.

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ या ५१ व्या गळीत हंगामाच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून मिल रोलर पूजन चेअरमन राजेंद्र नागवडे, संचालक सावता हिरवे व प्रवीण लबडे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासाहेब भोस होते.



चेअरमन नागवडे म्हणाले की, खाजगी कारखान्यांशी स्पर्धा करत असताना सहकारी साखर कारखानदारी समोर अनेक आव्हाने उभे आहेत. दिवसेंदिवस खर्च वाढत आहे मात्र गाळप हंगामाचे दिवस कमी होत आहेत. पूर्वी १७० ते १९० दिवसांपर्यंत गाळप हंगाम चालत होता. आता ११० ते १२० दिवसापर्यंत खाली आलेला आहे. त्यामुळे कारखान्याचे आर्थिक संतुलन राखणे अत्यंत कठीण झाले आहे.

व्हा. चेअरमन भोस म्हणाले की, स्वर्गीय बापूंचा विचार आणि वारसा घेऊन राजेंद्रदादा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संचालक एक दिलाने काम करून जिल्ह्यात अग्रेसर ऊस भाव देण्यासाठी प्रयत्नशील आहे. नागवडे कारखान्यावरती सभासद शेतकऱ्यांचा विश्वास आहे. भविष्यातही ही संस्था भक्कमपणे उभी करण्याकरिता सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे.

> व. नागवडे यांनी साठ वर्षांपूर्वी उभ्या केलेल्या कारखान्याचा ५१ व्या गळीत हंगामाचा रोलर पूजन आज आपण करत असताना आनंद होत आहे. बापूंचे विचार आणि संस्काराची शिदोरी बरोबर घेऊन व सर्व सहकारी संचालकांच्या सहकार्याने सभासद, ऊस उत्पादक शेतकरी यांना सातत्याने चांगला भाव देऊन न्याय देण्याची यशस्वीपणे भूमिका पार पाडलेली आहे. भविष्यातही नागवडे कारखाना ऊस भावात मागे राहणार नाही.
>
> **– राजेंद्र नागवडे, चेअरमन**

प्रास्ताविक संचालक भाऊसाहेब नेटके यांनी केले तर शरद जगताप यांनी आभार व्यक्त केले. यावेळी संचालक श्रीनिवास घाटगे, राकेश पाचपुते, प्रशांत दरेकर, योगेश भोईटे, डी. आर. काकडे, प्रा. सुरेश रसाळ, बंडू जगताप, संदीप औटी, दत्तात्रय कातोरे, सरपंच प्रवीण शिर्के, प्रा. भगवान शिर्के, प्रवीण शिंदे यासह आदी उपस्थित होते.

यावेळी कारखान्याच्या केनयार्ड विभागातील भाऊसाहेब पडळकर, हनुमंत काळे व उत्तम दरेकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करून निरोप देण्यात आला.

# व्होट जिहादचे उत्तर विधानसभेत हिंदूंनी एकत्रित दिले

## डॉ. सुजय विखे पाटील; आ. जगताप यांच्या समर्थनार्थ हिंदू समाजाच्या वतीने महासभा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आमदार संग्राम जगताप हे एक हिंदुत्वाचा विचार आहे. त्यांना समर्थन देण्यासाठी आपण सर्वजण एकत्रित आलो आहे. माझ्या संकट काळामध्ये साथ देणारा सच्चा मित्र देखील आहे. अबू आझमीला बोलण्याची परवानगी असेल तर आमदार संग्राम जगताप यांना हिंदुत्वावर बोलण्याचा हक्क आहे. महाराष्ट्रात संपूर्णपणे गोहत्या बंदी झाली पाहिजे आणि महिला सुरक्षित राहिल्या पाहिजे, यासाठी सर्वांनी एकत्रित येणे गरजेचे आहे. लोकसभेचे व्होट जिहादचे उत्तर विधानसभेत हिंदूंनी एकत्रित येऊन दिले असल्याचे प्रतिपादन खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आमदार संग्राम जगताप यांच्या समर्थनार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने महासभा संपन्न झाली. यावेळी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील, हभप संग्रामबापू भंडारे, मंदार बुवा रामदासी अजिनाथ महाराज पालवे, राजेंद्र जंजाळ, रवी पडवळ, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी उपमहापौर गणेश भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर अध्यक्ष संपत बारस्कर उपस्थित होते.



हभप संग्राम बापू भंडारे म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांनी हिंदुत्वाचे काम सुरू केले असून त्यांना संपूर्ण महाराष्ट्रातून समर्थन मिळत आहे. आता हिंदूंचे सरकार आले आहे. जसा अयोध्येचा निकाल हिंदूंच्या बाजूने लागला आहे. तसाच देशातील इतर मंदिरांचा देखील निकाल हिंदूंच्या बाजूनेच लागेल. आमदार संग्राम जगताप यांच्या बद्दल अपशब्द वापरणाऱ्या जिहादी लोकांना धडा शिकवा लागणार आहे. सागर बेग म्हणाले की, खासदार निलेश लंके हे मुल्ला असून त्याला संसदेत पाठवले आहे, जिथे जिथे गोरक्षकावर गुन्हे दाखल झाले आहे, तिथे या मुल्लाने पोलिसांना फोन केले आहे. या मुल्लाने संसदेमध्ये वक्त बोर्डच्या बाजूने मतदान केले आहे. आपण सर्वांनी पुढील लोकसभेमध्ये हिंदुत्ववादी उमेदवाराला निवडून आणले पाहिजे.

आमदार संग्राम जगताप यांच्या समर्थनार्थ आयोजित सकल हिंदू समाजाच्या सभेनंतर एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली. ह. भ. प. संग्राम बापू भंडारे, सागर बेग, मंदारबुवा रामदासी, अजिनाथ महाराज पालवे, राजेंद्र जंजाळ आणि रवी पडवळ या मान्यवरांनी स्वर्गीय अरुण काका जगताप यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करत आमदार संग्राम जगताप यांच्याशी चर्चा केली.

# संजीवनीच्या १४ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड




**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगांव:** संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचा ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभाग वेगवेगळ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांशी संपर्क साधुन आपल्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळवुन देण्यासाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करतो. अशाच प्रयत्नातुन विप्रो परी या बहुराष्ट्रीय कंपनीने संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या अंतिम वर्षातील १४ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी आकर्षक पगारावर निवड केली आहे. अशी माहिती संजीवनी महाविद्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

विप्रो परी (प्रिसिझन ऑटोमेशन अँड रोबोटिक्स इंडिया) या बहुराष्ट्रीय कंपनीने संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या अंतिम वर्षातील सहा, इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या तीन, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या दोन व मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या तीन विद्यार्थ्यांची त्यांच्या अंतिम निकाला अगोदरच नोकरीसाठी निवड केली आहे. ग्रामीण भागातील मुला मुलींना नोकरीच्या संधी मिळाव्यात, काहींनी उद्योजक बनावे, या हेतुने माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी १९८३ साली संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजची स्थापना केली. त्यांचा हेतु सफल होत आहे. कारण आज पावेतो हजारो अभियंते देश परदेशात कार्यरत आहे तर काही नामांकित उद्योजक बनले. यामुळे ग्रामीण अर्थ कारणाला बळकटी मिळाली आहे.

# अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई

## जामखेड येथील तीन हॉटेल चालकांवर खाडे यांची कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या पथकाने जामखेड येथे अवैध दारूची विक्री करणाऱ्या हॉटेलवर छापे टाकत देशी विदेशी दारू जप्त करण्यात आली. ही कारवाई शनिवारी करण्यात आली असून, याप्रकरणी तीन जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

परिविक्षाधीन पोलिस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात कारवाईची मोहीम उघडली आहे. जिल्ह्यातील जुगार, दारू, गुटखा विक्री करणाऱ्यांवर कारवाया करण्यात आले आहे. तसेच साहेबा हॉटेल (खर्डा रोड, जामखेड), ३७४६० किमतीचे देशी विदेशी दारू विक्री करताना मिळून आले



तसेच हॉटेल तांबे, (खर्डा रोड, जामखेड), १६,८५४ रुपये किमतीचे देशी विदेशी दारू ताब्यात मिळुन आला आहे. हॉटेल कावेरी (नगर रोड,जामखेड), ५०८० रुपये किमतीचे दारू त्याच्या ताब्यातून मिळुन आली आहे. मुद्देमालासह पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले. शनिवारी या पथकाने जामखेड नगर रोड व खर्डा रोड येथे अवैधरित्या दारूची विक्री करणाऱ्या हॉटेलचा शोध घेऊन छापे टाकले. दारू विक्रीचा कोणताही परवाना नसताना देशी, विदेशी दारूची विक्री केली जात होती. पथकाने हॉटेलमधून दारू जप्त करण्यात आली असून, विक्री करणाऱ्यांविरोधात जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



# मुरूम तस्करी करणाऱ्या दोघांवर कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** खांबे ता. संगमनेर येथे विना परवाना मुरूमाची तस्करी करतांना दोन ट्रॅक्टर महसुल विभागाने पकडले असुन पुढील कारवाईसाठी सदर वाहने आश्वी पोलिस ठाणे येथे जमा करण्यात आल्याची माहिती खांबे येथील ग्राम महसूल अधिकारी दिपक घाटेकर यांनी दिली. सविस्त माहिती अशी की, खांबे (ता.संगमनेर) येथे तहसिलदार धीरज मांजरे यांना एका इसमाने फोन करून सांगितले की, खांबे ये़थे अवैध्यरित्या गैण खनिज उत्खनन केले जात आहे. दिवसा प्रशासनाच्या डोळ्यात धूळ फेकत मुरूमाची तस्करी केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार करावाई करण्यासाठी ग्राममहसुल अधिकारी दिपक घाटेकर व युवा प्रशिक्षणार्थी नारायण कापडी घटनास्थळी पोहचले.खांबे ते म्हैसगाव जाणारे रोडवर न्याहारवाडी पाझर तलाव येथील खांबे शिवारात दोन ट्रॅक्टर मुरूमची वाहतूक करताना आढळून आले. दोन्ही ट्रॅक्टरमध्ये साधारणतः प्रत्येकी १ हजार रूपये असा एकूण दोन हजार रुपये किंमतीचा मुरूम आढळून आला. ट्रॅक्टर चालक सागर चिमा राहिंज व रविंद्र भाऊसाहेब वाल्हेकर (दोघे राहणार खांबे ता. संगमनेर) यांच्यावर कारवाई करणायात आली आहे.

# धरणाची भिंत कोरून मुरूमाची चोरी

## संबंधितांवर कारवाई करण्याची ग्रामस्थांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** गोळवाडी (राम नगर) ता. वैजापूर येथे रोजगार हमी योजनेअंतर्गत पाझर तलाव क्रं.२ हा झालेला आहे. सदरील पाझर तलावाची भिंत अज्ञात व्यक्तीने जेसीबी व ट्रॅक्टरच्या सहाय्याने सदरील पाझर तलावाची भिंत कोरुन माती-मुरुम बेकायदेशिररित्या चोरून नेला आहे.

,तहसिल कार्यालय, कलेक्टर ऑफीस व इतर कार्यालयाची कोणतीही परवानगी नसताना गौन खनिज (माती-मुरुम) चोरुन नेला. सदर पाझर तलावाची भिंत कोरल्यामुळे धरणात पाणी साठल्यानंतर पाझर तलाव फुटून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.



धरण फुटल्यास होणाऱ्या परिणामास व नुकसान भरपाईस संबंधित कार्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.तरी योग्य ती चौकशी करुन संबंधितावर कादेशिर कार्यवाही व्हावी. परत कोणीही गौन खनिज (माती-मुरुम) चोरुन नेणार नाही याची तात्काळ उपाययोजना करावी. अशी मागणी अनिल अशोक सुराशे, रामचंद्र किसनराव सुराशे व शैलेश केशवराव सुराशे यांनी केली आहे.

सदरील पाझर तलावाचे तात्काळ दुरुस्ती करुन उपाययोजना कराव्यात, नसता धरणाखालील शेतकऱ्यांच्या जमीनीचे, पिकांचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होईल. ज्या जेसीबी मालकाने पाझर तलावाची भिंत कोरली त्यांच्यावर व ट्रॅक्टर चालकावर चौकशी होऊन कायदेशिर कार्यवाही करण्यात यावी. जेसीबी व ट्रॅक्टर जप्त करण्याचे आदेश व्हावेत.

# माऊली सोहळा सोलापूर जिल्ह्यात दाखल



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** यंदा प्रथमच एकत्रितपणे दिंड्या होवून निघालेला श्रीक्षेत्र नेवासा येथील ज्ञानेश्वरी पालखी पायी सोहळा रविवारी सायंकाळी सोलापूरात दाखल झाला. ठिक-ठिकाणी पालखी सोहळ्याचे नागरिकांनी स्वागत केले.

नेवासा ज्ञानेश्वर मंदिराचे विश्वस्त वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली हातात टाळ मुदुंग घेऊन दिंडीत भजन आणि अभंग गात विठुलाचे नामस्मरण करत पंढरपूरकडे वारकरी रवाना झालेले आहेत. या पायी दिंडी सोहळ्यामध्ये नेवासा तालुक्यासह जिल्ह्यातील २० ते २५ दिंड्यांचा समावेश असून, या दिंडी सोहळ्यात १० ते १२ हजार भाविक सहभागी झालेले आहे. श्रीक्षेत्र नेवासा दिंडीचे ठिकठिकाणी मोठे जल्लोषात स्वागत करण्यात येत आहे. मुक्काम ठिकाणी वेगवेगळ्या महाराजांचे किर्तन होत आहेत. सोमवारी पालखी सोहळा जैऊर स्टेशन, विटाचीवाडी पार करून हा कंदर येथे विसावला होता.

यावेळी ज्ञानेश्वर मंदिर देवस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग यांच्या सह ज्ञानेश्वर कारखान्याचे संचालक दादासाहेब गंडाळ, अशोक मिसाळ आदिंनी भेट देवून पालखी नियोजनाची माहिती घेतली.

# ‘वारकऱ्यांच्या सेवाकार्यातून जीवनात ऊर्जा’

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** संत रविदास महाराज यांच्या मानाच्या दोन पायी दिंडीचे शहरात चर्मकार विकास संघाच्या वतीने भक्तीभावाने स्वागत करण्यात आले. ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात व टाळ मृदंगाच्या गजरात आलेल्या दिंडीने भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

संत रविदास महाराजांची त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर व टाकळीमिया ते पंढरपूर पायी दिंडी दरवर्षी मोठ्या भक्तीभावाने आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जात असती. या दिंडीचे अहिल्यानगर शहरातून प्रस्थान होत असताना चर्मकार विकास संघाच्या



वतीने उत्साहात स्वागत करण्यात येते. चर्मकार विकास संघाच्या मुख्य कार्यालय व लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे हा सोहळा पार पडला.संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांनी दिंडीचे संचालक ह.भ.प. दत्तात्रय महाराज चिंधे, राम दास पठाडे, गणपत अभंग, उत्तम साबळे, ह.भ.प. जनार्दन सूर्यवंशी यांचा सत्कार करुन दिंडीसाठी आर्थिक मदत दिली. यावेळी संतोष कानडे, अरुण गाडेकर, विनोद कांबळे, रुपेश लोखंडे, संतोष कांबळे, दिलीप कांबळे उपस्थित होते.

# भालगाव शाळेतील विकासकामांत अनियमितता

## ठेकेदाराचे बिल अदा करू नये; शाळा समितीची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** भालगाव ग्रामपंचायत अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी वित्त आयोगाच्या निधीतून प्रस्तावित विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व बनावटगीरी झाल्याचा गंभीर आरोप शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वैजनाथ खंदारे यांनी केला आहे.

ठेकेदारने ग्रामपंचायत मार्फत संगनमत करून तब्बल ८ लाख २४ हजार १६० रुपये इतकं बिल काढण्याचा प्रयत्न केला असून, प्रत्यक्षात अनेक कामे झालीच नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शाळेसाठी टेबल, फरशीखाली काँक्रीट, मॅट, रंगकाम आदींचे टेंडर काढण्यात आले असून, १५ जुलै २०२४ रोजी त्याला तांत्रिक मंजुरीही घेण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात शाळेला कोणतीही नवीन टेबल देण्यात आलेली नसून जी टेबल आहेत, ती निवडणूक काळात ग्राम निधीतून अत्यावश्यक फर्निचर म्हणून खरेदी केलेली असल्याचा खुलासा तक्रारीत करण्यात आला आहे.दोन वर्गांमध्ये कोणतेही काँक्रीट न करता जुन्या वापरलेल्या फरशा वापरण्यात आल्या असून मॅट तर एकाही वर्गात वापरण्यात आलेल्या नाहीत. याव्यतिरिक्त सरकारी दवाखान्यावर केवळ ५ हजार रुपये खर्च करून १ लाखाचे बिल, अंगणवाडीसाठी १० हजारांच्या डागडुजीसाठी १ लाखाचा खर्च, तर पाणीपुरवठा नसतानाही ३ लाख ४१ हजार रुपयांचे बनावट बिल सादर करण्यात आल्याचेही नमूद आहे.

शाळेतील मीटिंग हॉलमध्ये याआधीच संभाजीनगरच्या एका कंपनीने सीएसआर फंडातून रंगकाम, पीओपी, स्टेज आदी कामे केली होती. मात्र, तीच कामे पुन्हा या टेंडरमध्ये दाखवून निधी उचलण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती देण्यात आली आहे. या सर्व प्रकारांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत सदस्य व गावकरी यांनी केली आहे. तरी ठेकेदाराचे बिल अदा करू नये अशी मागणी खंदारे यांनी केली आहे.

# पतसंस्था म्हणजे शेतकऱ्यांचा आधारस्तंभ : डॉ. थोरात

## संगमनेर तालुका पतसंस्था फेडरेशनच्या वतीने दोन दिवसीय प्रशिक्षण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** पतसंस्था म्हणजे केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून, ती ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जीवनाशी थेट जोडलेली एक महत्त्वाची सामाजिक आणि आर्थिक नाळ आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना फक्त आर्थिक मदतच नाही तर आत्मविश्वास, स्थैर्य आणि भविष्यातील वाटचालीसाठी आधार मिळतो. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी शेतकरी हितासाठी जे कार्य केले, त्यातून खरी सहकारी चळवळ साकारली. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आज या चळवळीला अधिक मजबुती देण्याचे काम संगमनेर तालुका पतसंस्था फेडरेशन करत आहे, असे उद्गार एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ .जयश्री थोरात यांनी काढले.

संगमनेर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने पतसंस्थांमधील अधिकारी, संचालक आणि कर्मचारी यांच्यासाठी नाशिक जिल्ह्यातील सापुतारा जवळील हातगड किल्ल्यावर दोन दिवसीय



विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्दिष्ट म्हणजे पतसंस्थांचे व्यवस्थापन अधिक सक्षम करणे, निर्णय प्रक्रियेत गुणवत्ता वाढवणे आणि नवीन तंत्रज्ञान व संकल्पना आत्मसात करणे होय.

प्रशिक्षणासाठी जात असलेल्या या शिष्टमंडळाने संगमनेरमध्ये यशोधन कार्यालय येथे थांबून डॉ.जयश्री थोरात यांची भेट घेतली. यावेळी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष बापूसाहेब टाक, विकास वाव्हळ,मधुकर गुंजाळ, देविदास गोरे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या, पतसंस्था फेडरेशनने हा अतिशय विधायक उपक्रम राबवला असून अशा प्रकारच्या शिबिरांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ज्ञानवर्धन होईल. यामध्ये भाग घेणाऱ्यांना नवीन विचार, संकल्पना आणि धोरणे समजून घेण्याची संधी मिळेल. यामुळे संस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि कार्यक्षम बनतील.

*या दोन दिवसीय शिबिरात पतसंस्थांच्या कामकाजाशी संबंधित विविध विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शक करणार असून, व्यवस्थापन कौशल्य, नेतृत्व विकास, वित्त नियोजन, डिजिटल व्यवहार, पतसंस्था कायदे व नियम, ग्राहक सेवा, आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे. संपूर्ण संगमनेर तालुक्यातील पतसंस्थांमधील पदाधिकारी व कर्मचारी या शिबिरामध्ये सहभागी होत असून, सर्वांचा सहभाग उत्स्फूर्त आणि प्रेरणादायी ठरत आहे.*

# ‘डॉक्टर्स डे’ निमित्त विशेष पुरवणी

## आयुर्वेदिक सौंदर्य वैद्यकशास्त्र : एक आधुनिक दृष्टिकोन

सौंदर्य म्हणजे केवळ बाह्यरुप नव्हे, तर आंतरिक तेज, आत्मविश्वास आणि व्यक्तिम त्वाचा निलाफ होय. यात शारीरिक सुसंवाद, मानसिक शांतता आणि भावनिक समतोल याचा समावेश असतो. आजच्या जगात सौंदर्य म्हणजे एक परिपूर्ण आणि सकारात्मक व्यक्तिमत्व जे इतरांवर प्रभाव टाकते.

आज या आधुनिक युगात जिथे रासायनिक उत्पादनांचा भडीमार आहे. तिथे आयुर्वेदिक सौंदर्य वैद्यकशास्त्र पुन्हा एकदा लोकांच्या पसंतीस उतरत आहे. कारण की एक उपचार पद्धती नाही, तर एक जीवनशैली आहे. केवळ नैसर्गिक सौंदर्यच नव्हे, तर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपले रूप अधिक आकर्षक बनविण्याची संधी आता उपलब्ध आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, वैद्यकशास्त्र व्यक्तीला अधिक सुंदर, तरुण व आत्मविश्वासाने परिपूर्ण बनविण्यास मदत करते.



चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करणे, त्वचेचा पोत सुधारणे किंवा मुरुमांचे उपचार करणे, अनावश्यक केस काढणे किंवा केस उगवण्याचा प्रयत्न करणे, चेहऱ्यावरील चमक वाढवणे, केसातील कोंडा, त्वचाविकार यासाठी बोटोक्स, फिलर्स, लेझर उपचार आयुर्वेदिक-केमिकल पिल्स, मायक्रोडम ब्रिशन याबरोबर पोटातून आयुर्वेदिक औषध सेवन, योग्य आहार, योग, याचा वापर केला जातो. याशिवाय आयुर्वेदाचे आधारस्तंभ जसे नियमित दिनचर्या, ऋतुचार्य, पंचकर्म चिकित्सा, नैसर्गिक औषधी वनस्पती वापरून बनविलेले उवटन (लेप) अभ्यंग, शिरोभ्यंग, केश लेप, नैसर्गिक केश प्रक्षालन (शाम्पू) हे उपयुक्त ठरतात.

मात्र कोणताही उपचार घेण्यापूर्वी योग्य आणि अनुभवी सौंदर्य वैद्यकाशी सल्लामसलत करणे आवश्यक आहे. उपचारांचे फायदे सामान्य धोके आणि योग्य काळजी याबद्दल सर्व माहिती घेणे आवश्यक आहे.

**– डॉ. सौ. ऐश्वर्या मोरे**
एम.डी. (आयु.) आयुर्वेदिक तज्ज्ञ

आयुर्वेदिक सौंदर्य वैद्यकशास्त्र हे केवळ बाह्य रूपावर लक्ष केंद्रित न करता समग्र आरोग्याला महत्त्व देते. कारण, खरे सौंदर्य हे आतून उगम पावते आणि ते आपल्या जीवनशैलीचा आरसा आहे. म्हणूनच आजच्या काळात या शास्त्राचे महत्व अधिकच वाढले आहे. म्हणून प्रत्येकाने त्याचा लाभ घेतला पाहिजे.

## त्वचा ही शरीराचा, मनाचा आरसा

**त्वचा सौन्दर्यसम्पन्ना, कान्त्या युक्ता सदा भवेत्।**
**स्वास्थ्यं च त्वचां रक्षेत्, प्राकृतं तेज ऊर्जितम्।।**

या सुंदर सुभाषितांचा अर्थ असा की, त्वचा सुंदर, चम कदार आणि निरोगी राहावी, कारण चांगले आरोग्य हीच त्वचेच्या सौंदर्याची खरी गुरुकिल्ली आहे



त्वचेचा रंग गोरा असो किंवा सावळा, त्वचा निरोगी असणे जास्त महत्वाचे असते. आपल्या शरीराचे महत्वाचे अंग आपली त्वचा असते आणि हिच त्वचा काळजी घेण्यापासून उपेक्षित राहते. त्यामुळे इतर शारीरिक व्याधींसाठी जसे आपण औषध पाणी घेतो तसेच त्वचा विकारांसाठी सुद्धा औषधे गरजेची असतात. आपली त्वचा ही आपल्या शरीराचा,मनाचा आरसा असते. त्यामुळेच आपल्या मनावर काही आघात झाले, मनामध्ये आपण काही दडवून ठेवले असेल तर आपल्याला त्वचा विकारांची सुरुवात होऊ शकते. मानसिक आरोग्य आणि त्वचेचे विकार याचा खूप जवळचा संबंध होमिओपॅथी या उपचार पद्धती मध्ये आढळतो. काविळ झाल्यावर जशी त्वचा पिवळी पडते तसेच आपल्या मनाला काही व्याधी झाली किंवा काही कारणांमुळे मनावर काही ताण, दडपण असेल तर त्वचेवर त्याचा वाईट परिणाम दिसून येतो. , , जळवात ( तळहात, तळपाय यांना भेगा पडणे) चेहऱ्यावर मुरूम येणे, वांग येणे, केस गळणे, पांढरे होणे, कोंडा होणे या सारख्या तक्रारी उद्भवतात. मानसिक ताण ही तर आजच्या धकाधकीच्या जगातील महत्त्वाची समस्या आहे. दैनंदिन जीवनात ताण खूप वाढला आहे. त्यामुळेच त्वचेच्या विकारांमध्ये मध्ये पण झपाट्याने वाढ झाली आहे. माझ्या पुण्यातील होमिओपॅथी क्लिनिक मध्ये मी वरील सगळ्या आजारांवर तसेच , गर्भाशयाच्या गाठी, मासिकपाळी नियमित होणे, किडनी स्टोन, पित्ताशयात खडे होणे, डायबिटीस, बीपी, आणि अश्या अनेक व्याधींवर सक्षम आणि प्रभावी उपचार करू शकत आहे.

**डॉ. राधिका होते**
होमिओपॅथिक कन्स्लटन्ट
बॅच फ्लोअर थेरपिस्ट
मोबा. : ९०२८८१२९२५




## मधुमेह (Diabetes) म्हणजे काय?


डॉ. अक्षय शिरसाठ

मधुमेह, ज्याला रक्तातील साखरेचा आजार देखील म्हणतात, ही एक अशी स्थिती आहे ज्यामध्ये रक्तातील साखरेची पातळी सामान्य पेक्षा जास्त असते. स्वादुपिंड (pancreas) पुरेसे इंसुलिन (insulin) तयार करत नाही किंवा शरीर तयार झालेल्या इन्सुलिनचा प्रभावीपणे वापर करत नाही, तेव्हा मधुमेह होतो.

### मधुमेहाची लक्षणे:

वारंवार लघवी होणे, विशेषतः रात्री जास्त लघवी लागते

**अति तहान लागणे:** खूप जास्त तहान लागते आणि जास्त प्रमाणात पाणी प्यावेसे वाटते.

**थकवा येणे:** थोडं काम केल्यावरही खूप थकवा येतो.

**वजन कमी होणे:** कोणतीही मेहनत न करता वजन कमी होते.

**दृष्टी कमी होणे:** दृष्टी कमी होऊ शकते किंवा अंधुक दिसू शकते.

**जखम लवकर न भरणे:** शरीरावरची जखम लवकर भरून येत नाही.

**वारंवार संसर्ग:** वारंवार संसर्ग होण्याची शक्यता असते.

**तोंडाला कोरड पडणे:** तोंड कोरडे पडते आणि अस्वस्थ वाटते.

### मधुमेहावरील उपचार:

**जीवनशैलीत बदल:** संतुलित आहार, नियमित व्यायाम, आणि वजन नियंत्रणात ठेवणे.

**तोंडी औषधे:** काही रुग्णांना रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी तोंडावाटे औषधे घ्यावी लागतात.

**इन्सुलिनचे इंजेक्शन:** काही रुग्णांना इन्सुलिनचे इंजेक्शन घेणे आवश्यक असते.

**रक्तातील साखरेचे निरीक्षण:** नियमितपणे रक्तातील साखरेची पातळी तपासणे आवश्यक आहे.

### मधुमेहाचे प्रकार:

**टाइप १ मधुमेह:** शरीरात इन्सुलिन तयार होत नाही.

**टाइप २ मधुमेह:** शरीर इन्सुलिनचा योग्य प्रकारे वापर करत नाही.

**गर्भधारणेतील मधुमेह:** काही स्त्रियांच्या बाबतीत गर्भधारणेदरम्यान रक्तातील साखरेची पातळी वाढते.

### मधुमेह टाळण्यासाठी:

**निरोगी आहार:** फळे, भाज्या, आणि संपूर्ण धान्ये खाणे.

**नियमित व्यायाम:** दररोज व्यायाम करणे.

**वजन नियंत्रणात ठेवणे:** जास्त वजन असल्यास ते कमी करणे.

**धूम्रपान आणि मद्यपान टाळणे:** या दोन्ही गोष्टी मधुमेहासाठी हानिकारक आहेत.

**टीप:** मधुमेह झाल्यास, डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.
















हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11